# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पित

## दिनांक २७/११/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **२७ नोव्हेंबर २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
4. श्री. अ. रशीद खान (मामु)
5. श्री. वसंत नरवडे पाटील
6. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
7. डॉ. आशा बिनवडे
8. श्री. संजय जोशी
9. श्री. पुरूषोत्तम ठाकूर
10. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
11. श्री. मो. जावेद मो. इसाक
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे : माजी महापौर श्री.अ.रशिद खान यांचे वडील पै.हमीद खान यांचे दुखःद निधन झालेले आहे त्यांना सभागृतर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.संजय जोशी : शिवसेना नेते स्व.प्रमोदजी नवलकर यांचे दुखःद निधन झाले त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर
श्री.हिम्मतराव दाभाडे : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.
(याच वेळी माजी महापौर श्री.अ.रशिद खान (मामू)यांचे वडील पै.हमीद खान तसेच स्व.प्रमोदजी नवलकर यांचे दुखःद निधन झाल्याने सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.सभापती : विषयपत्रिका अगोदर घेण्यात येत आहे. नंतर चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

**विषय क्र. 206 :**

दि.**18/9/2007**(का.प.क्र.9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दि.18/9/2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.207 :** ( दि.20/3/2007 च्या सभेतील विषय क्र.294 वरील निर्णयानुसार उप आयुक्तांचा स्थळपाहणी अहवाल प्राप्त झाला असून सोबत जोडण्यात येत आहे.)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर प्रभागातील शाहूनगर येथील उद्यानामध्ये आरसीसी स्लॅबने आच्छादित पाण्याचा हौद असून सदर हौत वापरात नसल्याने ह्या हौदाच्या आडोशाने होणारा गैरवापर, त्यामुळे लगतच्या रहिवाशांना होणारा त्रास याबाबत ह्या भागातील नागरीकांनी व स.सदस्यांनी पत्र देवून सदरचा हौद तोडून जमीन/जागा उद्यान वापरायोग्य करावी म्हणून मागणी केली आहे. तरी सदर हौद तोडण्याच्या कार्यवाहीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 अन्वये स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर प्रभागातील शाहूनगर येथील उद्यानामध्ये आरसीसी स्लॅबने आच्छादित वापराविना असलेला पाण्याचा हौद तोडून जमीन/जागा उद्यान वापरायोग्य करण्यासाठी सदर हौद तोडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 208 :**

(दि.6/11/07 च्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 193 )

उप आयुक्त(प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका ग्रंथालयासाठी मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी साहित्य/पुस्तके खरेदीस्तव पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणाऱ्या पुस्तक पुरवठाधारकाकडून "सर्वाधिक सूट" देणारे दर मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या अखेरच्या दिनांकापर्यंत पाच निविदा विकल्या गेल्या आणि निविदा सादर करावयाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत 5 निविदा प्राप्त झाल्या. ग्रंथालयात व वाचनालयात वर्षभर विविध पुस्तके/साहित्य खरेदी करणेस्तव या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा धारकांनी दर्शविल्या "सर्वाधिक सूट" संदर्भात सर्व निविदाधारकांशी चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्व साहित्य प्रकारावर निम्ननिर्देशित "सर्वाधिक सूट" देणेचे पुरवठाधारकांनी मान्य केले.

| अ.क्र. | ग्रंथ प्रकार | निविदा सर्वाधिक सुट | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मिनर्व्हा बुक डिस्ट्रीब्युटर | जिवनग्रंथ वितरण | परिमल प्रकाशन | जनशक्ती पब्लिकेशन | श्री उद्योग |
| **अ** | **ललित साहित्य** | | | | | |
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8% | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | -- | 12% | 12% | 12% | 12% |
| **ब** | **संदर्भ ग्रंथ** | | | | | |
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8- | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | | 12% | 12% | 12% | 12% |
| **क** | **क्रमिक पुस्तके** | | | | | |
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8% | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | -- | 12% | 12% | 12% | 12% |
| **ड** | शासकीय प्रकाशने | -- | -- | -- | -- | -- |
| **इ** | लॉ बुक्स | -- | 5% | 5% | 5% | 5% |
| **ई** | दिवाळी अंक | -- | -- | -- | -- | -- |

उपरोक्त पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणारे दर दर्शविण्यात आले आहेत. सदरील पुस्तके/वाचन साहित्य याकरीता सन 2007-08 च्या अर्थसंकल्पाचा रू.17/- लक्ष एवढी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. सदरील तरतुदीच्या अधिन राहून वर्षभरात पुस्तक पुरवठाधारकांकडून मान्य असलेल्या "सर्वाधिक सूट" दरांपेक्षा कमी नाही या तत्वावर वेळोवेळी पुस्तक खरेदी करणेत येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे : मागिल बैठकी या संदर्भात जी समिती नियुक्त त्या समितीच्या विधाराधीन व ज्या पुस्तकाची आवश्यकता आहे जेणे करून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचाही त्यात उल्लेख असावा, विद्यार्थ्यांना चांगले ज्ञान प्राप्त होईल अशी पुस्तके खरेदी करण्याची सुचना करावी.

श्री.संजय जोशी : जी वाचनीय पुस्तके आहे तेच खरेदी कराण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती : जी सुचना सदस्यांनी केली त्यांची नोंद प्रशासनाने घेवून कार्यवाही करावी या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका ग्रंथालयासाठी मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी साहित्य/पुस्तके खरेदीस्तव मागविण्यात आलेल्या निविदानुसार पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणाऱ्या पुस्तक पुरवठाधारकाकडून मान्य असलेल्या "सर्वाधिक सूट" दरांपेक्षा कमी नाही या तत्वावर वर्षभरात वेळोवेळी पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 209 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.69 जवाहर कॉल्नी येथील अशोक नगर व सारंग सोसायटी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे व साईड पंख्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सन 2006-07 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.22,67,515/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केली असून या कामाचा खर्च पृष्ठ क्र.156 वर अ.क्र.14 वर उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

करीता अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.69 जवाहर कॉलनी येथील अशोक नगर व सारंग सोसायटी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे व साईड पंख्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.22,67,515/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 210 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.98 अंतर्गत कांचनवाडी येथे शेकुदादा मोटे यांच्या घरापासुन ते मनपा हद्दीपर्यंत कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.10,49,000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असुन या कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते(शहर) या लेखाशिर्षाखाली पृष्ठ क्र.155 वर उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

तरी सदरील कामासाठी अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.98 अंतर्गत कांचनवाडी येथे शेकुदादा मोटे यांच्या घरापासुन ते मनपा हद्दीपर्यंत कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,49,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 211 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.7 भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.विभागाचे सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.11,99,550/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी दि.20.9.2007 अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामासाठी अर्थसंकल्प सन 2007-08 मध्ये "स्लम भागात पुन:र्डांबरीकरण" या लेखाशिर्षकातून पृष्ठ क्र.56 अ.क्र.05 व पृष्ठ क्र.181 अ.क्र.01 नुसार रक्कम रूपये (7.00+5.00)12.00 लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11,99,550/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.7 भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,99,550/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 212 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.23 मसनतपुर या ठिकाणी 200 मी.मी. व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. मसनतपुर या ठिकाणी अंतर्गत जलवाहिनी ए.सी. असल्यामुळे वारंवार नादुरूस्त होत असून घाण पाण्यासंबंधी तक्रारी वाढत आहेत. तसेच मसनतपुर जलकुंभ भरण्यासाठी ए.सी. कमी व्यासाची जलवाहिनी असून ती वारंवार फुटत आहे. करीता अंतर्गत कमी व्यासाच्या ए.सी. जलवाहिनी बदलून व जलकुंभ भरण्यासाठी 200 मीमी व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,806/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामासाठी होणारा खर्च हा अर्थसंकल्प 2007-08 चे पृष्ठ क्र.W 234 अ.क्र.8 मध्ये नांवासह 5.00 लक्षची तरतुद आहे व दि.18/7/2007 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.943 मध्ये नमुद 3 कामांची तरतुद रू.15.00 लक्ष या कामासाठी वळती करण्यात आलेली आहे. असे एकूण 20.00 लक्ष तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी वॉर्ड क्र.23 मसनतपुर या ठिकाणी 200 मीमी व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,806/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.23 मसनतपुर या ठिकाणी 200 मी.मी. व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,99,806/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 213 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.65 रमानगर अंतर्गत मंगल कार्यालय बांधणे करीता सा.बां.विभागाचे सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार एकूण रक्कम रू.19,25,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत व्यापारी संकुले व इतर इमारती पान क्र.W229 अ.क्र.12 च्या तरतुदी अन्वये करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,25,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.65 रमानगर अंतर्गत मंगल कार्यालय बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,25,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 214 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.95, पदमपुरा अंतर्गत विविध गल्ल्यात कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठीचे जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.16,32,415/- चे तयार करण्यात आले असुन त्यास दि.29/9/2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र.W-125 व 126 अ.क्र.54 ते 59 व 76 नुसार 17.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामासाठी रक्कम रू.16,32,415/- अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.95, पदमपुरा अंतर्गत विविध गल्ल्यात कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,32,415/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 215 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.39, राजाबाजार अंतर्गत विविध गल्ल्यात कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठीचे जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.17,58,548/- चे तयार करण्यात आले असुन त्यास दि.8/10/2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र.W-125 व 126 अ.क्र.65 ते 70 व 74 नुसार 18.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामासाठी रक्कम रू.17,58,548/- अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.39, राजाबाजार अंतर्गत विविध गल्ल्यात कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामाकीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,58,548/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 216 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्रमांक 69 अंतर्गत भगवती कॉलनी, लोकमीत्र कॉलनी, स्नेहवर्धीनी कॉलनी व इतर भागात 100, 150 व 200 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकारण विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.19,61,979/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. ह्या कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,61,979/- चे विचारार्थ तथा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्रमांक 69 अंतर्गत भगवती कॉलनी, लोकमीत्र कॉलनी, स्नेहवर्धीनी कॉलनी व इतर भागात 100, 150 व 200 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी

टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,61,979/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 217 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.47 मधील खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सा.बां. विभागाच्या सन 2006-07 जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.14,37,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.82 वरील अ.क्र.38 ते 42 मधील तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,37,000/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.47 मधील खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,37,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 218 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.88 अंतर्गत म्हाडा कॉर्नर रेल्वे गेटजवळ, देवानगरी, टेहलसिंग विहार अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,94,500/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झालेली असून या कामाचा खर्च खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

1. प्रभाग फ अर्थसंकल्प 2007-2008 मधील पृष्ठ क्र.156 वरील अ.क्र.9 व पृष्ठ क्र.181 वरील अ.क्र.36, पृष्ठ क्र.157 वरील अ.क्र.25 या कामासाठी उपलब्ध तरतुद (4.00+5.00+5.00)=14.00 लक्ष

सदरील काम प्रभाग क्र.88 अंतर्गत म्हाडा कॉर्नर रेल्वे गेटजवळ, देवानगरी, टेहलसिंग विहार अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.88 अंतर्गत म्हाडा कॉर्नर रेल्वे गेटजवळ, देवानगरी, टेहलसिंग विहार अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,94,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 219 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.90 एकनाथनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.12,47,000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | शहा कॉलनी अंतर्गत कॉंक्रीट कॉंक्रीट/फरशी/पेव्हींग ब्लॉक बसविणे पृष्ठ क्र.163 अ.क्र.12 | 1.00 लाख |
| 2. | एकनाथनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे पृष्ठ क्र.164 अ.क्र.15 | 2.50 लाख |
| 3. | एकनाथनगर मेनरोड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणे पृष्ठ क्र.188 | 9.00 लाख |

अ.क्र.86

कामासाठी उपलबध तरतुद(1.00+2.50+9.00) **12.50**

सदरील काम प्रभाग क्र.90, एकनाथनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.90 एकनाथनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 12,47,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 220 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.69 जवाहर कॉलनी भागात शास्त्रीनगर, स्नेहवर्धिनी व आरोग्य केंद्र येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,39,500/- असून, अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे. या कामासाठी खालील प्रमाणे तरतूद उपलब्ध असून, प्रभाग फ अर्थसंकल्प 2007-08 मधील पान क्र.W164 वरील अ.क्र.16, 17 व 19 वरील अनुक्रमे रू.6.00 लक्ष, 5.00 लक्ष व रू.2.50 लक्ष अशी एकत्रित रू.**13.50** लक्ष मधुन सदरील काम प्रस्तावित आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.69 जवाहर कॉलनी भागात शास्त्रीनगर, स्नेहवर्धिनी व आरोग्य केंद्र येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.13,39,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 221 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.92 कबीरनगर अंतर्गत नागसेननगर, त्रिभुवन चौक ते रेवे क्रॉसिंग पर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.15,00,000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

1. प्रभाग फ अर्थसंकल्प 2007-2008 मधील पृष्ठ क्र.154 वरील अ.क्र.7 व 8 या कामासाठी उपलब्ध तरतुद (10.00+5.00) = एकूण **15.00** लाख

सदरील काम प्रभाग क्र.92 कबीरनगर अंतर्गत नागसेननगर, त्रिभुवन चौक ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.92 कबीरनगर अंतर्गत नागसेननगर, त्रिभुवन चौक ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या  आलेल्या रक्कम रू.15,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 222 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मो.लक्ष्मीनगर, गारखेडा अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,72,136/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते(शहर) या लेखाशिर्षा खाली पृष्ठ क्र.164 अ.क्र.12 वर उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील काम मो.लक्ष्मीनगर, गारखेडा अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.लक्ष्मीनगर, गारखेडा अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,72,136/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 223 :**

अतिरिक्त शहर अभियां यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.69 व्यंकटेश कॉलनी, स्नेहवर्धिनी कालनी, जवाहर कॉलनी, भगवत कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.14,98,380/- चे आहे. सदर रस्त्याचे पुर्वी दि.21.1.2002 रोजी डांबरीकरण करण्यात आलेले होते. या कामाचा समावेश सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रू.14,98,380/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.69 व्यंकटेश कॉलनी, स्नेहवर्धिनी कालनी, जवाहर कॉलनी, भगवत कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,98,380/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 224 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.69 शास्त्रीनगर, विनायकनगर, समर्थ सोसायटी अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.11,93,100/- चे आहे. या कामाचा समावेश सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या असून कामाकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रू.11,93,100/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.69 शास्त्रीनगर, विनायकनगर, समर्थ सोसायटी अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,93,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 225 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेनेज, विद्युत, इमारती, उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील सर्व वाहतुक संकेतांक (ट्राफिक सिग्नल) जुने झालेले असून नागरीकांना योग्य प्रकारे दिसत नाहीत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. वाहनधारकांना सिग्नल चांगल्या प्रकारे दिसावे म्हणुन शहरातील एकुण 27 चौकातील जुन्या वाहतूक संकेतकाची आधुनिकीकरण केल्याने वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, याबाबत मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून देखील पाठपुरावा होत आहे. तसेच पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा यांचे पण सिग्नल आधुनिकीकरणाबाबत वेळोवेळी पत्र येत आहे. त्यामुळे योग्य प्रकारे वाहतुक सुविधे करीता 27 वाहतुक संकेतांकाचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक सा.बां. राज्य वाहतूक शाखा, मुंबई यांच्या सन 2007-08 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.1,00,00,000/- (रूपये एक कोटी) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च बाराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्यर निधीतुन प्रस्तावीत केला असुन त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाची निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई/निविदा/95/07 दिनांक 1-10-07 अन्वये दैनिक लोकमत, लोकसत्ता पुणे, सांजवार्ता, संजयवार्ता, लोकपत्र मध्ये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यंत एकुण दोन (2) निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी एकुण दोन (2) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

1. मे. सीएमएस ट्राफिक सिस्टम लि., मुंबई — 11.15% कमी दराने
2. मे. न्युक्लॉनीक्स, पुणे — 5.75% जास्त दराने

उपरोक्त प्रमाणे मे. सीएमएस ट्राफिक सिस्टम लि., मुंबई यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.15% कमी दराची निविदा आहे. करीता मे. सीएमएस ट्राफिक सिस्टम लि., मुंबई यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.15% कमीदराची निविदा मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सर्व वाहतुक संकेतांक (ट्राफिक सिग्नल) बदलण्याकरीता, एकुण 27 चौकातील जुन्या वाहतूक संकेतकांचे आधुनिकीकरण करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 11.15% कमी दराची मे. सी एम एस ट्राफिक सिस्टम लि., मुंबई यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 226 :</u>**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, सेव्हनहिल ते शिवाजीनगर जलकुंभा पर्यंत रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करावयाच्या आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.41,55,870/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. ह्या कामाचा खर्च हा 12 व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन करण्यात येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना जा.क्र./100/2007 अन्वये बी-1 निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या निर्धारीत वेळेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा खालील प्रमाणेच्या आहेत.

1. श्री. व्ही. आर. महाजन — 38% जास्त दराने
2. मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स — 45% जास्त दराने

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या पाहता श्री.व्ही.आर.महाजन यांचा दर कमी आहे. परंतु मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. तसेच मे. इलेक्ट्रो स्टील कास्टींग लि. या दोन्ही कंपन्यांनी दि. 18 व 19 ऑक्टोबर 2007 ला दिलेल्या दरासोबत निविदेतील फक्त पाईपांच्या दरासोबत तुलना केली असता श्री.व्ही.आर.महाजन यांची

निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.12% जास्त एवढी येते. उक्त दरात श्री.व्ही.आर. महाजन यांनी दि.6.11.2007 रोजी काम करण्याबाबत लेखी संमती दिली आहे.

करीता श्री.व्ही.आर. महाजन यांनी दिलेल्या लेखी संमती नुसार त्यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.12% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल ते शिवाजीनगर जलकुंभा पर्यंत रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची निविदाधारक श्री.व्ही.आर.महाजन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार, सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 24.12% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 227 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे हैद्राबाद येथील हुडा मार्फत लुंबीनी पार्क येथे बसविण्यात आल्याप्रमाणे रबराईज्ड सेफ्टी फ्लोरींग बसविण्याकरीता रक्कम रू.26.80 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च 12 व्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 2 निविदा विक्री झाल्या व 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

1. इकोफ्लेक्स सरफेसेस प्रा.लि. अंदाजपत्रकीय दराने
2. स्काय इंटरप्रायजेस तांत्रिक मुद्यान्वये निविदा उघडण्यात आली नाही.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा इकोफ्लेक्स सरफेसेस प्रा.लि. यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार इकोफ्लेक्स सरफेसेस प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे (हैद्राबाद येथील हुडा मार्फत लुंबीनी पार्क येथे बसविण्यात आल्याप्रमाणे) रबराईज्ड सेफ्टी फ्लोरींग बसविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची इकोफ्लेक्स सरफेसेस प्रा. लि. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 228 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.जिन्सी येथील न.भू.क्र.9545 मधील जागा शहराच्या (सुधारीत) मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार 30 मीटर रूंद (चंपा मस्जीद ते जालना रोड) रस्त्यात पूर्णतः बाधीत होत आहे. उक्त रस्त्याच्या बाधीत मिळकतीच्या भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव दिनांक 19.8.97 रोजी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविलेला आहे. भूसंपादनाच्या कार्यवाही अंतर्गत उक्त रस्त्याची संयुक्त मोजणीसाठी आवश्यक ती फी रूपये 29,700/- नगर भूमापन कार्यालय, औरंगाबादच्या नांवे भरणा करण्यात आलेली आहे. मोजणी नकाशा व अहवाल अप्राप्त आहे.

वरील 30 मीटर रूंद रस्त्यात वरील नमुद केलेली मिळकत पूर्णतः (194.00 चौ.मी.) बाधीत होत असून मिळकत धारक श्री.हिराचंद देवचंद कोळी यांनी आर.सी.एस.क्र.1063/02 नुसार मा.न्यायालयात उक्त रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळणेकरीता दावा दाखल केला होता. मा.न्यायालयाने उक्त दावा निकाली काढून महानगरपालिकेस आदेश दिले की, महानगरपालिकेने जागा संपादीत करून प्रचलित

शासकीय दरानुसार मोबदला द्यावा किंवा भूसंपादनासाठी प्रकरण मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावे. अर्जदाराने उक्त बाधीत क्षेत्राचा मोबदला खाजगी वाटाघाटीने देण्याची विनंती केल्यानुसार खाजगी वाटाघाटीने मोबदला देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सन 2007 मधील आरआर नुसार 6300/- रूपये प्रति चौ.मी. दर आहेत. एकूण क्षेत्र 194.00 x 6300 = 12,22,200/- एवढा होतो. त्यामधून 50% खरेदी खताच्या खर्चाची रक्कम रू.36,940/- वजा जाता देय मोबदला रक्कम रू.12,22,200 - 36,940 = 11,85,260/- (अक्षरी अकरा लाख पंच्याऐंशी हजार दोनशे साठ मात्र) आहे. त्यापैकी 10 टक्के रक्कम खरेदी खताचे वेळी व उर्वरीत 90 टक्के रक्कम बाधीत क्षेत्राची मालकी पी.आर.कार्डवर औरंगाबाद महानगरपालिकेचे नांवे नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

करीता वरील प्रमाणे देय मोबदला रक्कम रूपये 11,85,260/- व खरेदी खताचा मनपाने खर्च करावयाची उर्वरीत 50% रक्कम रू36,940/- या रक्कमेच्या मंजुरीस्तव भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : पुर्ण तपासणी करूनच कार्यवाही व्हावी.

श्री.वसंत नरवडे : खाजगी वाटाघाटी करण्याचे बंद केले होते मा.जिल्हाधिकारी यांचेकडून सूचना आलेल्या होत्या.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.जिन्सी येथील न.भू.क्र. 9545 मधील जागा शहराच्या (सुधारीत) मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार 30 मीटर रूंद (चंपा मस्जीद ते जालना रोड) रस्त्यात बाधीत एकूण 194.00 चौ.मी. क्षेत्राचा देय मोबदला रक्कम रू.12,22,200/- मधून 50% खरेदी खताच्या खर्चाची रक्कम रू.36,940/- वजा जाता उर्वरीत र.रू.11,85,260/- (अक्षरी अकरा लाख पंच्याऐंशी हजार दोनशे साठ मात्र) मिळकत धारक श्री.हिराचंद देवचंद कोळी यांना अदा करण्यास तसेच खरेदी खतासाठी लागणारी उर्वरीत 50% र.रू.36,940/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 229 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.93 मधील वेदांतनगर पाण्याच्या टाकी जवळील खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता सा.बां.विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,99,984/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.114 दि.4.9.2007 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 3 निविदा विक्री झाल्या व 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | काझी म.फारूख म.इस्माईल | 11.88% कमी दराने |
| 2. | एल. के. कन्स्ट्रक्शन | 10.53% कमी दराने |
| 3. | काझी मुबारीजउद्यीन बशीर उद्यीन | 7.91% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 11.88% कमी दराची निविदा काझी म.फाररूख म.इस्माईल यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार काझी म.फारूख म.इस्माईल यांची अं.प.दरापेक्षा 11.88% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.93 मधील वेदांतनगर पाण्याच्या टाकी जवळील खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 11.88% कमी दराची काझी म. फारूख म. इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 230 :**

प्रस्ताव सादर करणेत येतो की, मालमत्ता कर, शासनाचे कर व पाणीपट्टी कराचा भरणा दरवर्षी मागणी बिले दिल्यानंतर साधारणतः 15 दिवसाचे आत नागरिकांनी भरणे अपेक्षित असते. परंतु 90% नागरीकांकडून महानगरपालिकेचा कर भरणा करणेस प्रतिसाद मिळत नाही. परिणामतः मालमत्ता कराची वसूली कमी होते. मालमत्ता कर वेळेवर भरणा करावा म्हणून सर्वसामान्य मालमत्ता धारकास काहीही काळजी वाटत नाही. याउलट बिनदिक्कतपणे कराचा भरणा वर्षानुवर्ष करत नाहीत. कारण त्यावर दंडनिय कारवाई किंवा व्याज वगैरे आकारले जात नाहीत. करीता मिळकत धारकांस डिमांड नोटीस बजावल्यानंतर कराचा भरणा केला नाही तर मालमत्ता धारकास **थकीत व चालू मागणीवर 6% विलंब शुल्क (Delay payment charges)** वसूली करावी. तसेच डिमांड नोटीस नंतरही कराचा भरणा केला नाही व जप्तीची कार्यवाही करणे भाग पडल्यास मालमत्ता धारकांकडून त्यांचेकडे थकबाकी व मालमत्ता कर असलेल्या एकूण कराचे रक्कमेवर **12% वसूली व प्रशासकीय खर्च (Administrative & Recovery charges)** म्हणून आकारण्यात यावेत.

वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही केल्यास कुणीही कर भरणा करणार नाही. नोटीस गेलेल्या नाहीत.

श्री.वसंत नरवडे : दोन बैठकीपुर्वीच खुलासा केला होता की, करदाता यांना डिमांड नोटीस पाठविलेल्या नाही. 90 दिवसातून सहा दिवसाच्या आत व सहा 6 टक्के व्याज ऐवजी 12 टक्के व्याज आकारून वसूली करणे हे नागरीकांवर अन्यायकारक आहे. प्रशासनातील कर्मचा-याकडून वसूली करून घ्यावी. करधारकांना थकीत रक्कमेवर व्याज लावू नये. यास आमचा विरोध आहे.

श्री.संजय जोशी : 6 टक्के व्याज व जप्तीची कार्यवाही झाल्यास होणारा प्रशासनाच्या खर्चासह म्हणजे 12 टक्के आकारून वसूली करणार असे दिले.परंतु जकातीचे खाजगीकरण झाले तेथील कर्मचा-यांना कोणते काम दिले संगणकीकरण करीत आहोत म्हणून डिमांड नोटीस दिलेल्या नाही असे गेल्या बैठकीत म्हटले होते. डिमांड नोटीस पोहचली नाही विलंब शुल्क आकारून वसूली करण्याचा अधिकार पोहचत नाही. माझ्या माहिती प्रमाणे एखादया वर्षी डिमांड नोटीस दिली नाही तर पुढील वर्षी कायदयद्यानुसार टॅक्स मागण्याचा अधिकार नाही. डिमांड नोटीस दयाव्यात दोन चार वेळेस वसुलीसाठी गेल्यास नागरीक कर भरणात विलंब शुल्क आकारल्यास नागरीकांवर अन्याय होईल. हा ठराव रद्द करावा.

मा. सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेता हा ठराव रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 231 :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालयास, मलेरीया विभागास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2007-08 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.24/4/2007 नुसार दै.नवभारत टाईम्स, इंडियन एक्सप्रेस, लोकसत्ता व सकाळ या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.2/7/2007 ते 12/7/-2007 या कालावधीत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व दि.16-7-2007 रोजी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर त्या-त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांक नमूद केलेले आहेत.

मा. आयुक्त यांनी टाटा कंपनीचे ब्रँडेड साहित्याकरीता प्राप्त दरात 10% दर कमी करण्याची शिफारस केली आहे. तसेच इतर ब्रँडेड ॲटम्सचे दर हे कमाल विक्री किंमतीपेक्षा कमी असल्याने त्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | यश ट्रेडींग | **51** | 1 ते 6, 8, 9, 12 ते 21, 23, 24, 26, 28 ते 45, 47 ते 59 |
| 2 | न्यु भारत स्टोअर्स | **11** | 7, 10, 11, 15, 16, 18, 22, 25, 28, 30 आणि 34 |
| 3 | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | **06** | 15, 24, 27, 30, 42 व 46 |

उपरोक्त ॲटमपैकी एकूण 6 ॲटममध्ये दोन निविदाधारकांचे दर समान आहेत तर दोन ॲटममध्ये तीन निविदाधारकांचे दर समान आहेत. एकूण अंदाजित खरेदीसाठी 14 लक्ष रूपये एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यासाठ 30 लक्ष रूपये अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात आली आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालयास, मलेरीया विभागास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2007-08 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदानुसार, खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार पुरवठाधारकांचे नांवासमोर त्या-त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांकास त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | यश ट्रेडींग | **51** | 1 ते 6, 8, 9, 12 ते 21, 23, 24, 26, 28 ते 45, 47 ते 59 |
| 2 | न्यु भारत स्टोअर्स | **11** | 7, 10, 11, 15, 16, 18, 22, 25, 28, 30 आणि 34 |
| 3 | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | **06** | 15, 24, 27, 30, 42 व 46 |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 232 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, वॉर्ड कार्यालयास तसेच महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2007-08 या वर्षाकरिता लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्याकरीता मा.आयुक्त यांची मान्यता दि.24.4.2007 नुसार दै.नवभारत, मुंबई, इंडियन एक्स्प्रेस, मुंबई, लोकसत्ता,पुणे, सकाळ औरंगाबाद, सामना औरंगाबाद या वर्तमानपत्रात दि.2.7.2007 ते 12.7.2007 दरम्यान निविदा विक्री ठेवण्यात आली. एकुण सात निविदांची विक्री झाली. दि.16.7.2007 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत भरलेल्या निविदा स्विकृत करण्यात आल्या. एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा दरांची तुलना गतवर्षीच्या मान्य दराशी केली असता

एकुण 161 आयटम पैकी 33 आयटममध्ये दर थोड्याफार प्रमाणात जास्त आहे. इतर आयटम मध्ये मागील वर्षापेक्षा कमी दर प्राप्त आहे. त्यानुसार अंदाजे रू.35000/- इतका जास्त खर्च येईल. त्यातही जकात पावती पुस्तक व रहदारी पावती पुस्तक छपाईसाठी मागील वर्षीच्या तुलनेत रू.25000/- इतका जास्तीचा खर्च येत आहे.

करीता प्राप्त निविदा दर मान्य करण्यास हरकत नाही. खालील प्रमाणे निविदा धारकांची नांवे दर्शविली असून त्यांच्या समोर त्यांचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटमची संख्या नमुद केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | लिबर्टी प्रिंटर्स | 57 |
| 2. | मिनाक्षी प्रिंटर्स | 65 |
| 3. | अभय ट्रेडर्स | 23 |
| 4. | विशाल प्रिंटर्स | 12 |
| 5. | जयभारती एक्स.बुक मॅन्यु. कं. | 05 |

एकुण 161 आयटम आहेत, त्यामध्ये चार आयटमचे दर दोन निविदा धारकांनी समान नमुद केले आहेत. त्यांना सदर साहित्याचे विभागून पुरवठा आदेश देण्यात येतील. एकुण अंदाजे जकात विभागासाठी रू.7.00 लक्ष, शिक्षण विभागासाठी रू.4.50 लक्ष व इतर सर्वसाधारण छपाई साहित्य खरेदीसाठी रू.7.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी : एक वर्षासाठी छपाईचे काम देणार आहे एक वर्ष मार्चपर्यत की टेंडर काढल्यापासून एक वर्षासाठी काम देणार आहे.

प्र. मुख्यलेखधिकारी : मार्चपासून एक वर्षासाठी आहे.

मा.सभापती : मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, वॉर्ड कार्यालयास तसेच महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2007-08 या वर्षाकरिता लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकांचे नांवासमोर प्रस्तावात नमूद केल्यानुसार त्या-त्या आयटम करीता संबंधीत कमी दराची निविदा स्विकारणेस, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 233 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (Integrated housing & slum development programme-IHSDP) अधिन औरंगाबाद महानगरपालिकेकडून केंद्र शासनाचे पुरस्कृत घरकुल योजनांची (1) मो.राहुलनगर, (2) मो.आंबेडकरनगर आणि (3) ब्रिजवाडी या तीनही ठिकाणी घरकुल योजना राबविणेसाठी मंजुरी प्राप्त आहे.

सदर घरकुल योजनाचे कामासाठी तीन वेळेस जाहीर निविदा सूचना नंतर तिसऱ्या निविदा दरम्यान पुढे नमुद प्रमाणे निविदा दर प्राप्त आहेत.

1) **मो. राहुलनगर योजना :** सदर योजना कामासाठी रू.1,09,92,359/- निविदा अंदाजपत्रकीय कामाचे करीता मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची एकच निविदा प्राप्त झाली. त्यांचे दाखल निविदा दर 38.78% जास्त या प्रमाणे आहेत. तसेच
2) **मो.आंबेडकरनगर योजना :** सदर योजना कामासाठी रू.7,87,27,621/- निविदा कामासाठी श्री.ललित अधाने यांची एक निविदा प्राप्त असुन त्यांचे निविदा दर 40.19% जास्त आहेत.

उक्त नमुद कंत्राटदाराचे निविदाचे जास्त दराची उपलब्धी असल्याने निविदा दर वाटाघाटीसाठी संबंधीत कंत्राटदार यांचे समवेत मा.आयुक्त यांचे दालनात दि.22/10/2007 रोजी वाटाघाटी संदर्भाने बैठक घेण्यात आली. सदर बैठकी दरम्यान वरील दोन्ही कामांच्या निविदांचे कंत्राटदार यांनी पुढे नमुद प्रमाणे कारणांमुळे जास्तीचे दराचे समर्थन केले. निविदा अंदाजपत्रकाचे दर सन 2005-06 दरसूची अनुसार असल्याने आणि प्रचलित दरसूची (2007-08) शी तुलना नुसार 30% एवढी दरवाढ झाली असल्यामुळे जास्तीचे दर संयुक्तीक आहेत. तसेच सदर कामाचे घरकुल जसजशी जुनी घरकुले तोडून नवीन कामासाठी जागा मिळणार आहे, त्यामुळे कामाची व्याप्ती एकसंघ न राहता तुटक प्रमाणाने राहणार असल्यामुळे आणि बाजारातील प्रचंड प्रमाणात दरवाढीसह सिमेंट, लोखंड, वाढीव दराची खडी व रेती यांचा बांधकामात प्रामुख्याने वापर असल्याने कंत्राटदारांनी त्यांचे जास्त दराचे समर्थन करून दर कमी करण्यास असमर्थता दाखविली. तथापी एवढ्या जास्त दराची निविदा संयुक्तीक नसल्याचे मा.आयुक्त यांनी प्रतिवादित केल्यावरून कंत्राटदार यांनी दाखल निविदा दरात तीन टक्के कपात करण्यास संमती दिली व पुढे नमुद दराने काम करण्यास तयारी दर्शविली.

1) **मो. राहुलनगर योजना :** मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची दाखल निविदा दर 38.78% जास्त ऐवजी वाटाघाटी संमत दर 35.78% जास्तीचे दर. आणि
2) **मो.आंबेडकरनगर योजना :** श्री.ललित अधाने यांची दाखल निविदा दर 40.19% जास्त ऐवजी वाटाघाटी संमत 37.19% जास्त दर.

वर प्रस्तावित प्रमाणे **Integrated housing & slum development programme** प्रकल्पाचे निविदासाठी वाटाघाटी संमत दरानुसार दरास मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशीद खान : एक टेंडर 35.78% जास्त दराचे असून दुसरे 37.19% जास्त दराचे आहे. एकाच प्रकारचे काम आहे, दोन्ही टेंडर सारखे नाही. यासाठी सभागृहाच्या वतीने मा.सभापती यांना अधिकार देण्यात यावेत. मा.सभापती यांनी स्थळ पाहणी करून 35.78% जास्त दरा प्रमाणे काम करणे जरूरी आहे की, 37.19% जास्त प्रमाणे काम करणे जरूरी आहे हे ठरवावे. मो.आंबेडकरनगर योजनेचा प्रस्ताव दोन दिवसांसाठी स्थगित ठेवून मा.सभापती यांनी पाहणी करून निर्णय घ्यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा.सभापती यांना अधिकार देण्याची सूचना मांडली परंतु या दोन्ही टेंडरमधील तफावत का आली याबाबत खुलसा घ्यावा.

श्री.वसंत नरवडे : कोणत्या वर्षी केंद्र शासनाचे अनुदान मिळालेले होते? अंदाजपत्रक कोणत्या वर्षी केले, ठेकेदार या रेटने का टेंडर भरतो आहे, काय अडचण आहे, हे रिवाईज का केलेले नाही?

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : मा. सभापती यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी व योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय जोशी : दोन्ही टेंडरमध्ये तफावत आहे. जो 37.19% जास्त दराने काम करणार आहे तो बाहेरून साहित्य आणणार आहे का? दोन अडीच टक्के जे वाढवून आले ते कशामुळे आले याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. एक सारख्याच कामाचे दोन वेगवेगळ्या रेटने टेंडर मंजूर करतो, ते वाढवून का आले? यामागचे काही लॉजीक असायला पाहिजे की नाही. त्यासाठी पाहणी करावी व अहवाल घ्यावा.

श्री.अ. रशीद खान : 37.19% जास्त दराची जी निविदा आली त्या बाबतीत मा.सभापती यांनी स्थळपाहणी करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा. सभापती यांनी दोन्ही कामांच्या निवदेमध्ये तफावत का आली याची पाहणी करून योग्य तो निर्णय घेण्याचे अधिकार मा.सभापती यांना देण्यात येतात.

मा. सभापती : राहूलनगर येथील कामासाठी मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांनी अं.प.दरापेक्षा 35.78% जास्त राने निविदा भरलेली आहे. ती सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात येते. त्याच पध्दतीचे मो. आंबेडकरनगर येथील काम असून त्याची निविदा 37.19% जास्त दराने आलेली आहे. एकाच प्रकारची दोनही कामे आहेत. परंतु दोन टक्केने निविदा दरामध्ये फरक का आलेला आहे हे तपासून सदरील कामाच्या बाबतीत सभागृहाने ठरविल्याप्रमाणे सभापती, स्थायी समिती निर्णय घेतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (Integrated housing & slum development programme-IHSDP) अधिन औरंगाबाद महानगरपालिकेकडून केंद्र शासनाचे पुरस्कृत घरकुल योजना राबविणेसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार मो. राहुलनगर येथील रक्कम रू.1,09,92,359/- खर्चाच्या योजनेसाठी मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार अं.प.दरापेक्षा 35.78% जास्त दराची मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मो.आंबेडकरनगर येथील कामासाठी प्राप्त झालेली श्री.ललित अधाने यांची निविदा वाटाघाटीअंती 37.19% जास्त दराने आलेली आहे. एकाच प्रकारच्या कामासाठी वेगवेगळ्या दराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे आंबेडकरनगर येथील काम संबंधीत ठेकेदार श्री.ललित अधाने हे 35.78% जास्त दराने करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून काम करून घेण्यात यावे. अन्यथा फेरनिविदा मागविण्यात याव्यात. त्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

मा. सभापती : ऐनवेळचे विषय क्र.234 ते 240 मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. 234 :**

प्रस्ताव ादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.37 औरंगपुरा अंतर्गत पैठणगेट, दलालवाडी, कामगार कॉलनी, पैठणगेट पार्कींग, सब्जीमंडी व इतर विविध गल्ल्यामधील जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन 225 व 250 मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे करीता सा.बां. विभाग सन 2006-07 चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.11,04,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.108 दि.4.9.2007 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 4 निविदा विक्री झाल्या व 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | काजी म. फारूख म. इस्माईल | 20% कमी दराने |
| 2. | असेण्ड कन्स्ट्रक्शन | 19.80% कमी दराने |
| 3. | शेख म. इब्राहीम | 14.99% कमी दराने |
| 4. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | 9.09% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 20% कमी दराची निविदा काजी म. फारूख म. इस्माईल यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार काजी म.फारूख म. इस्माईल यांची अं.प.दरापेक्षा 20% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.37 औरंगपुरा अंतर्गत पैठणगेट, दलालवाडी, कामगार कॉलनी, पैठणगेट पार्कींग, सब्जीमंडी व इतर विविध गल्ल्यामधील जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन 225 व 250 मीमी व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 20% कमी दराची काजी म. फारूख म. इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 235 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, किर्ती मंगल कार्यालय सिडको, टी.व्ही. सेंअर रोड ते एच-सेक्टर एन-9 येथे नाला चॅनल सहीत ट्रेनिंग करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन मुळ अं.प.रक्कम रू.9,81,000/- चे आहे व व त्यास मा.आयुक्त यांचे मान्यतेनंतर निविदा बोलविण्यात आल्या असून स्पर्धात्मक प्राप्त निविदा मधून मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची 4.90% जास्त दराच्या निविदा सर्वात कमी दराची असल्यामुळे त्यांचे सह वाटाघाटी अंती अ.प.दरापेक्षा 5% कमी दराने मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांना कार्यादेश देऊन काम करून घेण्यात येत असून प्रत्यक्ष स्थळाच्या परिस्थितीनुरूप झालेल्या बदलामुळे सुधारीत अं.प.रक्कम रू.13,61,000/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मंजुरीस्तव स्थायी समिती समोर ठेवणेस दि.8.11.2007 ला मा.आयुक्त यांची मंजुरी आहे.

सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,61,000/- चे मंजुरीस्तव तसेच मुळ मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जास्त लागणारी रक्कम रू.3,80,000/- चा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नला ट्रेनिंग या लेखा शिर्षातून भागविणेच्या व वाढीव कामासाठी वाढीव मुदत मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किर्ती मंगल कार्यालय सिडको, टी.व्ही. सेंअर रोड ते एच-सेक्टर एन-9 येथे नाला चॅनल सहीत ट्रेनिंग करणे या कामामध्ये, प्रत्यक्ष स्थळाच्या परिस्थितीनुरूप झालेल्या बदलामुळे सुधारीत अंदाजपत्रक रू.13,61,000/- नुसार, वाढीव र.रू.3,80,000/- चे कामासाठी सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नला ट्रेनिंग या लेखा शिर्षातून खर्च भागविणेस व वाढीव कामासाठी वाढीव मुदत देऊन सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 236 :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, महानगरपालिका हद्दीतील मेनहोल खुल्या गटारी व जलनि:सारण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्ती अंतर्गत लागणारे एस.एफ.आर.सी. कव्हर्स (ढापे) पुरवठा करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून र.रू.30,02,070/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र.499/11 दि.13.10.2006 अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे. एस. एस. मॅनेहोल ॲण्ड ग्रेटींग्ज 4% जास्त दराने
2. के. के. मॅनहोल ग्रेटींग्ज कंपनी 5% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4% जास्त दराची निविदा मे. एस.एस. मॅनहोल अँड ग्रेटींग्ज यांची आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे.

तरी मे. मे. एस.एस. मॅनहोल अँड ग्रेटींग्ज यांची अं.प.दरापेक्षा 4% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मेनहोल खुल्या गटारी व जलनि:सारण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्ती अंतर्गत लागणारे एस.एफ.आर.सी. कव्हर्स (ढापे) पुरवठा करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 4% जास्त दराची मे. एस. एस. मॅनहोल अँड ग्रेटींग्ज यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 237 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सन 2007-08 साला करीता वार्षिक ब्लिचींग पावडर ग्रेड-1 पुरवठ्या संदर्भात रूपये 29,07,000/- चे अंदाजपत्रक तयार केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे.

वार्षिक ब्लिचींग पावडर ग्रेड-1 पुरवठ्या संबंधी ई-निविदा विभागा मार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदा प्रक्रिये अंतर्गत या पुरवठ्याकरीता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी एकच निविदा प्राप्त झाली. त्याचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

1. क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा 13,770/- प्रति मे. टन

वरल प्रमाणे एकच निविदा प्राप्त झालेली असून मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने खरेदी करण्याची शिफारस केली आहे. या दराने एकूण 171 मे. टन पुरवठ्यासाठी एकूण रू.23,54,670/- रक्कमेचा खर्च होईल. मागील वर्षीचा दर हा रू.13,500/- प्रती मे.टन इतका होता.

उपरोक्त निविदे अंतर्गत वार्षिक ब्लिचींग पावडर ग्रेड-1 खरेदीसाठी मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांचेकडून रूपये 13,770/- प्रति मे.टन या दराने खरेदी करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 साला करीता वार्षिक ब्लिचींग पावडर ग्रेड-1 पुरवठ्या संदर्भात प्राप्त झालेल्या निविदानुसार, मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांचेकडून रूपये 13,770/- प्रति मे.टन या दराने खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रू.23,54,670/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 238 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.29 हिनानगर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आरसीसी पुल बांधणे या कमाचे रक्कम रू.14,13,283/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदरील कामासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एल. के. कन्स्ट्रक्शन | 8.78% कमी दराने |
| 2. | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | 5.57% कमी दराने |
| 3. | श्री.मुबारक महेबुब पठाण | 5.27% कमी दराने |
| 4. | मे. असेंट कन्स्ट्रक्शन | 4.72% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 8.78% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे. एल.के. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 8.78% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.29 हिनानगर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठीप्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 8.78% कमी दराची मे. एल.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 239 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.88 जयविश्वभारती कॉ. अंतर्गत मुख्य रस्त्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.12,15,500/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.12,15,500/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.88 जयविश्वभारती कॉ. अंतर्गत मुख्य रस्त्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामा करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,15,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 240 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.88 जयविश्वभारती कॉलनी या प्रभागातील राजनगर, मयुरबन, मधुबन, शांतीनाथ सोसायटी, दीपनगर, रामचंद्रनगर या भागात पुनःडांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रक रक्कम रू.16,98,000/- असून या कामास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामासाठी प्रभाग-फ अर्थसंकल्प 2007-08 या आर्थिक वर्षातील पृष्ठ क्र.W 156 वरील शहरी भागात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली अ.क्र.6, 10 व 13 वर अनुक्रमे 6.00 लाख, 4.00 लाख, 7.00 लाख अशी एकत्रित 17.00 लाख रूपयांची तरतुद उपलब्ध असून अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.88 जयविश्वभारती कॉलनी या प्रभागातील राजनगर, मयुरबन, मधुबन, शांतीनाथ सोसायटी, दीपनगर, रामचंद्रनगर या भागात पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,98,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 241 :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या 700 मीमी, 1219 मी.मी., 1400 मी.मी. शुध्द जलवाहिन्यांवर नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभाच्या ठिकाणी Ultra Sonic Insertion Fixed Flow Meter प्रवाह मोजण्यासाठी त्वरीत बसविणे आवश्यक आहे. औरंगाबाद शहर पाणी व उर्जा परिक्षणा अंतर्गतही Flow Meter बसविण्याबाबत शिफारस करण्यात आली अरहे. यामुळे येणारे व जाणारे पाणी याचा योग्य ताळमेळ बसवून वितरीत होणारे पाणी नियोजन करण्यासाठीही त्याचा उपयोग होईल.

वरील कामाच्या रू.13,40,000/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.13.9.2007 रोजी मंजुरी देवून प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याची शिफारस केली आहे. तरी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

दिनांक 7/8/2007 रोजीच्या स्थायी समिती सभा (दि.31/7/07 ची तहकुब सभा) ठराव क्र.82 अंतर्गत औरंगाबाद शहरास जायकवाडीउद्भवावरून 700 मी.मी. व 1219 मी.मी. व्यासाच्या

जलवाहिन्यांवर Ultra Sonic Insertion Fixed Flow Meter बसविणे व एक Ultra Sonic Insertion Fixed Flow Meter पुरविणे करीता रक्कम रूपये 13,10,100/- किंमतीच्या अंदाजपत्रकाला स्थायी समिती सभेने मंजुरी दिली होती. उपरोक्त काम व प्रस्तावित काम एकाच स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या एकत्रित निविदा काढणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामाचे लेखाशिर्ष पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती असून स्थायी समिती सभेने यापुर्वी मंजुर केलेल्या कामाचे लेखाशिर्ष पंप दुरूस्ती, मशीनरी खरेदी हे होते. त्यामुळे वरील दोन्ही कामांची लेखाशिर्ष वेगवेगळी असल्याने एकत्रित निविदा काढण्यासाठी फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी कळविले आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे नक्षत्रवाडी संतुलन टाकी येथे Flow Meter बसविण्याच्या रक्कम रूपये 13,40,000/- किंमतीचे अंदाजपत्रक व जायकवाडी तसेच नक्षत्रवाडी येथे Flow Meter बसविणे या अनुक्रमे रूपये 13,10,100/- व रूपये 13,40,000/- अशा एकत्रित रूपये 26,50,100/- किंमतीच्या कामाची एकच निविदा काढणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या 700 मीमी, 1219 मी.मी., 1400 मी.मी. शुध्द जलवाहिन्यांवर नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभाच्या ठिकाणी Ultra Sonic Insertion Fixed Flow Meter बसविण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रू.13,40,000/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे स्था.स.ठराव क्र.82 दि.7/8/07 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार जायकवाडी उद्‌भवावरून जलवाहिन्यांवर Flow Meter बसविणे तसेच नक्षत्रवाडी येथे Flow Meter बसविणे या अनुक्रमे रूपये 13,10,100/- व रूपये 13,40,000/- अशा एकत्रित रूपये 26,50,100/- किंमतीच्या कामाची एकच निविदा काढणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 242 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचेतर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 मध्ये मा.आयुक्त यांना महानगरपालिकेतर्फे फौजदारी कार्यवाही दाखल करणे व दिवाणी दावा दाखल करणे किंवा महानगरपालिकेविरूध्द दिवाणी दावा दाखल झाल्यास त्या अनुषंगाने करावयाच्या न्यायालयीन सर्व कार्यवाही संबंधीच्या तरतुदी नमूद केलेल्या आहेत.

उपरोक्त पोटकलम (1) चा खंड (अ) व्यतिरिक्त 481 मध्ये असलेले अधिकार, कर्तव्ये आणि कामे लेखी आदेशद्वारे कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास आयुक्तांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या पुर्ननिरीक्षणाच्या अधिकाराच्या अधीन राहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 69(1)(2) अन्वये मा.स्थायी समितीच्या मान्यतेने प्रदान करण्याची तरतुद आहे.

करीता उपरोक्त पोटकलम (1) चा खंड (अ) व्यतिरिक्त 481 मधील इतर अधिकार हे खालील अधिकारी यांना मा.आयुक्त यांच्याकडून प्रदान करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | शहर अभियंता | शहर अभियंता विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 2. | उप आयुक्त(प्र) | प्रकल्प संचालक, शिक्षण विभाग, पशुधन अधिकारी, कामगार विभाग, भांडार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विभागाच्या संबंधी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे. |
| 3. | उप आयुक्त (म) | जकात, मालमत्ता, अग्निशमन या विभागातील न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, महानगरपालिकेतर्फे वाद किंवा दावा दाखल करणे. |
| 4. | मुख्य लेखा परक्षक | मुख्य लेखा परीक्षक विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 5. | अतिरिक्त शहर अभियंता | अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब |

| | | |
|---|---|---|
| | | दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 6. | मुख्य लेखा अधिकारी | लेखा विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 7. | आरोग्य वैद्य. अधिकारी | आरोग्य विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब, प्रतिज्ञापत्र दाखल करणे. |
| 8. | कर निर्धारक व संकलक | कर आकारणी संबंधीच्या न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 9. | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 10. | कार्यकारी अभियंता (विद्युत, ड्रेनेज, उद्यान, इमारती बांधकाम) | विद्युत, ड्रेनेज, उद्यान, इमारती बांधकाम विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 11. | विधी सल्लागार | महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या वतीने वकील पत्रावर स्वाक्षरी करणे, न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करणे, वाद किंवा दावा चालविणे, मागे घेणे किंवा त्यामध्ये तडजोड करणे, महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणात संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांना साक्ष नोंदणीबाबत निर्देशित करण्याचे अधिकार. |
| 12. | सहा.संचालक नगर रचना उप अभियंता-1 व उप अभियंता-2 | कोणताही वाद किंवा दावा महानगरपालिकेतर्फे दाखल करणे, महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या नांवाने दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात जबाब, शपथपत्र दाखल करणे, अनधिकृत बांधकामासंबंधी फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| 13. | सहाय्यक आयुक्त-1 व 2 | आस्थापना विषयक न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, महानगरपालिकेतर्फे दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 14. | प्रशासकीय अधिकारी | अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण संबंधीच्या न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे किंवा फौजदारी गुन्हा दाखल करणे. |

यापुर्वी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे यासंबंधी मा. आयुक्त यांचेकडून संबंधीत अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार हा प्रस्ताव मंजुर झाल्यापासून रद्दबातल होतील.

वरील नमूद करण्यात आलेले आयुक्तांमध्ये विहित असलेले अधिकार उपरोक्त अधिकारी यांना प्रदान करण्यास मा.स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 481 मध्ये पोटकलम (1) चा खंड (अ) व्यतिरिक्त 481 मध्ये असलेले अधिकार, कर्तव्ये आणि कामे लेखी आदेशद्वारे कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास आयुक्तांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या पुर्ननिरीक्षणाच्या अधिकाराच्या अधीन राहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 69(1)(2) अन्वये, इतर अधिकार हे खालील अधिकारी यांना मा.आयुक्त यांच्याकडून प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| 1. | शहर अभियंता | शहर अभियंता विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 2. | उप आयुक्त(प्र) | प्रकल्प संचालक, शिक्षण विभाग, पशुधन अधिकारी, कामगार विभाग, भांडार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विभागाच्या संबंधी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे. |
| 3. | उप आयुक्त (म) | जकात, मालमत्ता, अग्निशमन या विभागातील न्यायालयीन प्रकरणात |

| | | |
|---|---|---|
| | | जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, महानगरपालिकेतर्फे वाद किंवा दावा दाखल करणे. |
| 4. | मुख्य लेखा परक्षक | मुख्य लेखा परीक्षक विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 5. | अतिरिक्त शहर अभियंता | अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 6. | मुख्य लेखा अधिकारी | लेखा विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 7. | आरोग्य वैद्य. अधिकारी | आरोग्य विभागाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात जबाब, प्रतिज्ञापत्र दाखल करणे. |
| 8. | कर निर्धारक व संकलक | कर आकारणी संबंधीच्या न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 9. | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 10. | कार्यकारी अभियंता (विद्युत, ड्रेनेज, उद्यान, इमारती बांधकाम) | विद्युत, ड्रेनेज, उद्यान, इमारती बांधकाम विभागाशी संबंधीत प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 11. | विधी सल्लागार | महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या वतीने वकील पत्रावर स्वाक्षरी करणे, न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करणे, वाद किंवा दावा चालविणे, मागे घेणे किंवा त्यामध्ये तडजोड करणे, महानगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणात संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांना साक्ष नोंदणीबाबत निर्देशित करण्याचे अधिकार. |
| 12. | सहा.संचालक नगर रचना उप अभियंता-1 व उप अभियंता-2 | कोणताही वाद किंवा दावा महानगरपालिकेतर्फे दाखल करणे, महानगरपालिकेच्या किंवा आयुक्तांच्या नांवाने दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात जबाब, शपथपत्र दाखल करणे, अनधिकृत बांधकामासंबंधी फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| 13. | सहाय्यक आयुक्त-1 व 2 | आस्थापना विषयक न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, महानगरपालिकेतर्फे दावा किंवा वाद दाखल करणे. |
| 14. | प्रशासकीय अधिकारी | अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण संबंधीच्या न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे किंवा फौजदारी गुन्हा दाखल करणे. |

यापुर्वी न्यायालयीन प्रकरणात जबाब दाखल करणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे यासंबंधी मा. आयुक्त यांचेकडून संबंधीत अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार हा प्रस्ताव मंजुर झाल्यापासून रद्दबातल होतील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 243 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सुभेदारी विश्राम गृहाजवळील ऐतिहासिक रंगीन दरवाजासाठी विद्युत रोषणाई करणे या कामाचे सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.1,67,093/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात ऐतिहासिक वास्तु दुरूस्ती या लेखा शिर्षातून करण्यात येत आहे. सदर काम हे सुभेदारी विश्रामगृह परिसरातील ऐतिहासिक दरवाजाचे आहे. विद्युत रोषणाई केल्याने शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. तसेच त्या ठिकाणी मंत्री मंडळ बैठकीसाठी विविध मान्यवरांची सतत वर्दळ असते. त्यामुळे हे काम तातडीचे असल्यामुळे प्रस्तावित काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड', प्रकरण 5-संविदा चे नियम (2) 2अन्वये उपलब्ध गुत्तेदार मे.सुप्रीम पॉवर इलेक्ट्रॉनीक्स यांच्याकडून

अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी देवून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केलेली आहे.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुभेदारी विश्राम गृहाजवळील ऐतिहासिक रंगीन दरवाजासाठी विद्युत रोषणाई करणे, हे काम तातडीचे असल्यामुळे प्रस्तावित काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड', प्रकरण 5-संविदा चे नियम (2) 2 अन्वये उपलब्ध गुत्तेदार मे.सुप्रीम पॉवर इलेक्ट्रॉनीक्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेल्या कामास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 244 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.34 नुर कॉलनी(स्लम) येथे पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाचे सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.11,01,500/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षात नविन काँक्रीट रस्ते या लेखा शिर्षातुन करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे व स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.11,01,500/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.34 नुर कॉलनी(स्लम) येथे पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,01,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 245 :**

दि.26/06/2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये प्रशासनाकडून सादर केलेल्या प्रस्ताव क्र.39 अन्वये महानगरपालिकेच्या रूग्णालयातून श्वानदंश रूग्णांना उपचार देत असतांना प्रति लस/व्हायल साठी रू.50/- आकारण्यास मंजुरी दिलेली होती. तथापी गेल्या काही दिवसांमध्ये शहरातील विविध भागात कुत्र्यांनी चावा घेण्याचे प्रकार वाढलेले आहेत. त्यामुळे श्वानदंश रूग्णांची संख्या वाढलेली असून नागरीकांमध्ये नाराजी दिसून येत आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, त्याच प्रमाणे श्वानदंश रूग्णांसाठी आवश्यक असणारी श्वानदंश प्रतिबंधक लस (A.R.V.) मनपा दवाखान्यातून उपलब्ध करून देणे ही देखील महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

म्हणून स्थायी समिती ठराव क्र.39 दि.26/6/2007 अन्वये घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्यात यावा. श्वानदंश प्रतिबंधक लस अशा रूग्णांसाठी महानगरपालिकेच्या दवाखान्यातून विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय(घाटी) प्रशासनाकडून मागणी करण्यात आल्यास घाटी रूग्णालयास गरजेप्रमाणे लसींचा पुरवठा करण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : अ. साजेद अ. सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या रूग्णालयातून श्वानदंश रूग्णांना उपचार देत असतांना प्रति लस/व्हायल साठी रू.50/- आकारणी करण्यासंबंधीचा स्थायी समिती ठराव क्र.39 दि.26/6/2007 अन्वये घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच श्वानदंश प्रतिबंधक लस अशा रूग्णांसाठी महानगरपालिकेच्या दवाखान्यातून विनामुल्य उपलब्ध करून देण्यास आणि वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय(घाटी) प्रशासनाकडून मागणी करण्यात आल्यास घाटी रूग्णालयास गरजेप्रमाणे लसींचा पुरवठा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 246 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा गणवेश नियम 2001 नुसार प्रतिवर्षी मनपा चतुर्थश्रेणी पुरूष कर्मचारी यांना दोन गणवेशाकरीता कापड दिले जाते. सदरील कापड खरेदी करीता मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार निविदा प्रसिध्दीस देण्यात आली. दिनांक 29.9.2007 ते दि.6.10.2007 पर्यंत निविदा विक्री झाल्या. व दिनांक 10.10.2007 रोजी निविदा स्विकृत करण्यात आल्या. एकुण 4 निविदा विक्री झाल्या व तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

1. रोशन सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद.
2. के. के. टेक्स्टाईल्स, जळगांव.
3. डिग्जाम रिटेल शो रूम, औरंगाबाद.

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी रोशन सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद व के.के. टेक्स्टाईल्स, जळगांव यांनी एस.कुमार या ब्रँडचे गणवेश कापड देण्याकरीता निविदा दाखल केलेली आहे. त्यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. दरांचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | कापडाचा प्रकार | संख्या/मीटर | प्राप्त दर-प्रति मिटर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1. | खाकी कापड - शर्टसाठी | 7100 | 71.00 | 5,04,100.00 |
| 2. | खाकी कापड - पँटसाठी | 4700 | 121.00 | 5,68,700.00 |
| 3. | निळे कापड - शर्टसाठी | 640 | 71.00 | 45,440.00 |
| 4. | निळे कापड - पँटसाठी | 400 | 121.00 | 48,400.00 |
| 5. | पांढरे कापड - शर्टसाठी | 1240 | 71.00 | 88,040.00 |
| 6. | पांढरे कापड - पँटसाठी | 775 | 121.00 | 93,775.00 |
| | | | एकूण - | 13,48,455.00 |

यावेळी प्रथमच नामांकीत कंपनीचे गणवेश कापड देण्यात येत आहे. त्यामुळे खर्चात वाढ झालेली आहे. प्राप्त दरात 2% दर कमी करून खरेदी करण्याकरीता मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. त्यानुसार सदरील गणवेश कापड खरेदीकरीता रक्कम रूपये 13,21,486/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरील दर्शविल्यानुसार प्राप्त दरात 2% दर कमी करून रोशन सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद व के.के. टेक्स्टाईल्स, जळगांव यांचेकडून गणवेश कापड खरेदी करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा गणवेश नियम 2001 नुसार मनपा चतुर्थश्रेणी पुरूष कर्मचारी यांना दोन गणवेशाकरीता कापड पुरविण्यासाठी, सदरील कापड खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक, रोशन सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद व के.के. टेक्स्टाईल्स, जळगांव यांचेकडून प्राप्त दरात 2% दर कमी करून एस.कुमार या ब्रँडचे गणवेश कापड खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.13, 21,486/- च्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 247 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.3 यादवनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,86,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, 4 निविदा पत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा पत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | के. बी. पाथ्रीकर | **17.21% कमी दराने** |
| 2. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | **16.91% कमी दराने** |
| 3. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | **15.00% कमी दराने** |
| 4. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **14.31% कमी दराने** |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.के. बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17.21% ने कमी आहेत. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील काम श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून अं.प.दरापेक्षा 17.21% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.3 यादवनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17.21% कमीदराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 248 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.77 अंतर्गत 11 मीटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 12,99,762/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 4 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली, त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | **18.86% कमी दराने** |
| 2. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **18.81% कमी दराने** |
| 3. | के. बी. पाथ्रीकर | **15.21% कमी दराने** |
| 4. | अरोरा कन्स्ट्रक्शन | **12.93% कमी दराने** |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.86% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.77 अंतर्गत 11 मीटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 18.86% कमी दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 249 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती ठराव क्र.155 दि.7/11/2006 अन्वये महापालिका अभियंत्यांना वाहन भत्ता वाढवून देण्यात आलेला आहे. सदर ठराव मंजूर करतांना मा.सभापती यांनी, स.पदाधिकाऱ्यांकडे काम करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना वाहन भत्ता वाढवून देण्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केलेले होते. त्या अनुषंगाने स.पदाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्या वाहन इंधन भत्ता म्हणून प्रतिमहा रू.200/- (दोनशे रूपये) अदा करण्यात येतात. इंधनाच्या दरवाढीचा विचार करता महापालिका अभियंत्याप्रमाणेच प्रतिमहा रू.500/- (अक्षरी रूपये पाचशी फक्त) वाहन भत्ता स्थायी समिती ठराव क्र.155 नुसार दि.7/11/2006 पासून अदा करण्यास मंजुरी देण्यात यावी. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : अ.साजेद अ. सत्तार अनुमोदक : पुनमचंद बमणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातील स.पदाधिकारी यांचे कार्यालयात स्वीय सहाय्यक स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना, इंधनाच्या दरवाढीचा विचार करता वाहन इंधन भत्ता प्रतिमहा रू.200/- (दोनशे रूपये) ऐवजी, प्रतिमहा रू.500/- (अक्षरी रूपये पाचशे फक्त) व नगर सचिव विभागातील टपाल

वाटप करणारे दोन शिपाई यांना प्रतिमहा रू.500/- वाहन भत्ता स्थायी समिती ठराव क्र.155 नुसार दि.7/11/2006 पासून अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. देखील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 250 :**

अतिरिक्त शहर अभियंता, मानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुष्पनगरी स्मशानभुमी रस्त्याची लेव्हल सरळ करून पाण्याचा निचरा करणे व डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कमामाचे अंदाजपत्रक र.रू.11,31,735/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातीलरस्त्याची लांबी 400 मी. व रूंदी सरासरी 5 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.11,31,735/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुष्पनगरी स्मशानभुमी रस्त्याची लेव्हल सरळ करून पाण्याचा निचरा करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,31,735/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मो.जावेदमो.इसाक : मजनूहिल डिपी रोडवर खंडडा खोदला होता त्या संदर्भात महापालिकेचे इमारत निरीक्षक यांना काही लोकानी मारहाण केली त्या संबधी काय कार्यवाही केलेली आहे.

प्र.प्रशासकीय अधि. : या रस्त्यावर एक खडडा असल्याची तक्रार आलेली होती तो बुजविण्याची दखल घेतली. त्यावेळी काही लोकांनी श्री. शेख इमारत निरीक्षक यांना धक्काबुक्की केलेली आहे. त्या संदर्भात श्री.शेख यांना संबधीतावर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्याचे आदेश देण्यात आले.

मा.सभापती : ज्या लोकांनी मारहाण केली त्यांचेवर त्वरीत गुन्हा दाखल होईल याची दखल घ्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : शहरात डेंग्यूचे अनेक रूग्ण आढळून येत आहे आजही घाटी दवाखन्यात 8 रूग्ण आहे. यापूर्वी ही माझ्या वार्डातील ॲडव्होकेट यांनी मुलीचा डेंग्यूमूळे मृत्यू झालेला होता. ड्रेनेजचे घाण पिण्याच्या पाण्यात येत आहे. कचरा उललल्या नंतर त्या जागेवर पावडर टाकले जाते की नाही याकडे आरोग्य विभाग वेळीच लक्ष आहे की नाही.

प्र.आरोग्य वैद्य.अधि. : डेंग्यूचा डासावर नियंत्रण करण्यासाठी वार्ड कार्यालया मार्फत फॉगींग चालू आहे. 28 फॉगींग मशीन कार्यरत असून वार्ड निहाय फवारणीचे काम चालू असून लोकांमध्ये जनजागरणाचे कामही चालू आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : मागिल बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली होती कोणकोणत्या भागात फॉगींग केलेले आहे फवारणी होते त्यांवेळी त्या त्या सदस्यांना माहिती दिली जात नाही. फवारणी केल्याची किमान सदस्यांची सही घेणे आवशयक आहे, तसे होत नाही.

पर्यवेक्षक (मलेरीया) : प्रत्येक वार्ड कार्यालय अंतर्गत चार फॉगिंग मशीन चालू असून स.सदस्यांच्या मागणीनुसार कार्यवाही करीत आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : व्हीआयपी, डीपी रोड वर कचरा पडलेला आहे. कचरा उचलल्यानंतर त्या जागेवर पावडर टाकले जात नाही.

मा.सभापती : मागिल बैठकीत निर्णय दिल्यानुसार कोणकोणत्या भागात फॉगींग करण्यात आलेली आहे पुढील बैठकीत सविस्तर माहिती सभागृहात ठेवावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : फॉगींग मशीनसाठी पुरेसे पेट्रोल दिले जात नाही. प्रत्येक वार्डवाईज औषध फवारणी होणे आवश्यक आहे. फवारणी चालू आहे का पुन्हा खुलासा घ्यावा.

पर्यवेक्षक(मलेरीया) : एकूण 28 फॉगींग मशीन चालू आहे. प्रत्येक वार्ड कार्यालय अंतर्गत चार मशीन दिलेल्या आहेत. फवारणी करतांना स.सदस्यांशी संपर्क करून कार्यवाही केली जाते.

मा.सभापती : ज्या वार्डात औषधी फवारणी होते त्यावेळी स.सदस्यांना विश्वासात घेवून कार्यवाही करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : गुलशन क्लॉथ सिटीचौक येथील अनधिकृत दुकान 24 तासाच्या आत हटविण्यात येईल असे सांगण्यात आले होते. हटविले का? विधी सल्लागार यांना दुरध्वनी वरून संपर्क साधला असता फोन उचलत नाही. विधी सल्लागार 14 तारखेला म्हणताय पीटीशन विड्रॉ केले. आपण दुकान तोडून दाखवावे असे प्रति उत्तर मला देण्यामागे त्यांचा हेतू काय होता. एक पदाधिकारी या नात्याने माझा त्यांनी अपमान केलेलाआहे त्यांचेवर कार्यवाही व्हावी. कॅव्हेट दाखल केल्यावर त्या व्यक्तीला चारचार वेळेस स्थगिती आदेश कशाच्या आधारे मिळते, जोपर्यंत विधी सल्लागार यांचेवर कार्यवाही होत नाही तोपर्यत मी आपल्या डायस समोर खाली बसत आहे.

(विघी सल्लागार यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश करण्याची विरोधी पक्षनेता हे मा.सभापती यांचे मागणी करतात.मा.सभापती यांचे डायससमोर खाली बसतात.)

श्री.संजय जोशी : विरोधी पक्ष नेता यांना विनंती की त्यांनी आपल्या जागेवर बसावे खुलासा घेता येईल त्यांना खाली बसण्याची वेळ येणे बरोबर नाही. 24 तासाच्या आत कार्यवाही करणार होते का झालेली नाही.

मा.सभापती : विरोधी पक्ष नेता यांना विधी सल्लागार यांनी अपशब्द -वापरले असेल तर ते योग्य नाही. स.विराधी पक्ष नेता यांनाविनंती की यांनी त्यांचे जागेवर बसावे. खुलासा घेत आहोत.

(याच वेळी स.विरोधी पक्ष नेता हे आपल्या जागेवर बसतात.)

विधी सल्लागार : कुलसुमबी विरूध्द महापालिका हा दावा जुन मध्ये दाखल झालेला होता दि. 3-9-2007रोजी स्टे व्हॅकेट झालेला होता मा.आयुक्त तसेच प्रशासकीय अधिकारी यांना दिं.4-9-2007 रोजी स्टे व्हॅकेट झालेला असून पुढील कार्यवाही करण्यास हरकत नाही असे पत्र देवून कळविले होते. त्यांनी जिल्हा न्यायालयात अपील करू नये या संबधी कॅव्हेट दाखल केलेले होते. सदर पार्टीने पुढील एक महिण्यामध्ये अपील केले नाही. त्यानंतर जेंव्हा स्थायी समिती समोर हा विषय आला त्यावेळेस म्हणजे आधीच दावा दाखल झालेला असल्यामूळे म्हणजे जो दावा अगोदरच दाखल झालेला असल्यामूळे पुन्हा तो दावा दाखल करण्याचा हक्क त्याच ग्राउंडवर वादीला राहत नाही. रेस्ट ज्युडीकेट होतो. विधी विभागाला कार्यवाही करणे अपेक्षीत वाटले नाही.

मा.आयुक्त : विधी सल्लागार यांना असे म्हणायचे की जर स्टे व्हॅकेट झाला असेल व तेच मॅटर दुस-या सम कक्षेतील कोर्टात असेल तर कार्यवाही करणे उचीत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दि.3-9-2007 रोजी स्टे व्हॅकेट होतो त्यानंतर लगेच कार्यवाही का केलेली नाही. एक प्रकरण कितीदा वेगवेगळया कोर्टात जाणार आहे महापालिकेचा रोल काय आहे.

विघीसल्लागार : नंतर वादीने सुटटीच्या कोर्टात सदर दावा दाखल केला पुर्वीच्या दाव्याचा त्यात संदर्भात दिलेला होता. जेंव्हा प्रकरण समोर आले तेंव्हा आपल्या पॅनलवरील वकील यांनी वादीच्या लक्षात आणून दिले की, सदर दावा पुर्वीच दाखल असल्यामुळे वादी पुन्हा दावा दाखल करू शकत नाही. त्यामूळै त्यांनी तो दावा 12 ते 13 तारखेला मागे घेतला यानंतर पुन्हा जिल्हा न्यायालयामध्ये कॅव्हेट दाखल करावे त्या अगोदरच वादीने मुळ याचीमध्ये जो मुळ दावा व्हॅकेट झाला होता त्या संदर्भात अपील केले होते. त्यातहीत्यांना डिले झालेला आहे परंतू ऑर्डर होईपर्यत मा.न्यायालयाकडून स्थगिती घेतलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दि. 3-9-2007 ला स्टे व्हॅकेट झाले असतांना कार्यवाही केली नाही. त्यानंतर सुटटीच्या कोर्टात त्यांनी स्टे त्याचे मनाप्रमाणे 13 तारखेला स्टे घेतला. मागिल बैठकीत उपआयुक्त यांनी बांधकाम परवानगी दिल्याचे खुलासा करून सभागृहाची दिशाभूल केली त्यानंतर संचिका मागविली नगर रचना विभागानु खुलासा केला की, परवानगी दिलेली नाही असे लक्षात आले त्यावर 24 तासाच्या आत कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते. विधी विभागाच्या मेहेरबानीने स्टे मिळतो. पुन्हा व्हॅकेट होतो सुट्टीच्या कोर्टात दाखल करून पुन्हा विड्रॉ केले जाते अशा वेळी विधी विभागाने वेळीच कार्यवाही का केली नाही. पीटीशन विड्रॉ केले, आता आपण तोडून दाखवावे असे विधी सल्लागार यांचा मला

बोलण्याचा हेतू काय होता. त्यांनी माझा अपमान केलेला आहे त्यांचेवर कार्यवाही करावी नसता मी गेट समोर उपोषणास बसेल.

विधी सल्लागार : दिनांक 11 तारखेला जो उशीरा दावा दाखल केला त्याबद्दल सुनावणी आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पुन्हा खोटी माहिती दिली जात आहे. 14 तारखेला स्टे मिळाला पुढील तारीख 22 मिळाली. बाहेर सेटलमेंट झाले. 20 दिवसानंतर तारीख वाढवून दिली यानंतर तारीख वाढवूनच मिळेल. या शहरातील नागरीकांना हे लक्षात येईल की महापालिकेच्या हद्यीत इमारत बांधणे सोपे आहे. जे कॅव्हेट दाखल होवून स्टे मिळतो . पार्टी जेव्हा वाटले तेंव्हा प्रकरण विड्रॉ करू शकते जेंव्हा वाटेल तेंव्हा दाखल करू शकते. दिनांक 3-9-2007 रोजी स्टे व्हॅकेट होतो महापालिकेचे कुणीही वकील हजर नाही पार्टीचे वकील नाही तरी स्टे व्हॅकेट होतो. स्टे व्हॅकेट झाल्यानंतर 14-11-2007पर्यत म्हणजे दोन महिणे प्रशासनाने कार्यवाही का केली नाही. विधी सल्लागार यांचेवर कार्यवाही व्हावी. मला का बोलले, माझे फोन का उचलत नाही.

मा.आयुक्त : या प्रकरणात लोअर कोर्टात ऑलरेडी स्टे व्हॅकेट झालेला होते. त्यानंतर त्यानी जिल्हा न्यायालयात कॅव्हेट दाखल केलेले होते. विरूध्द पार्टी होती त्यांना माहित होते की वरील कोर्टातील कॅव्हेट आहे. एकदा एका मा. न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्याशी सलग्न असलेल्या कोर्टात तेच मॅटर दाखल करता येत नाही. सदर पार्टीने माहिती लपवून सुटीच्या दिवशी जे कोर्ट चालू असते त्यांचेकडून स्टे घेतला. त्याच पार्टीला पुन्हा कळाले की कन्टेम्प्ट होईल म्हणून विड्रॉ केले. त्यामुळे समोरच्या पार्टीला एक दोन दिवस मिळाले. ही बाब वरील कोर्टाच्या नजरेस आणून दयायला पाहिजे. जिल्हा न्यायालयात कॅव्हेट दाखल असतांना स्टे कसा मिळाला हे समजले नाही. 22 तारीख दिलेली होती सदर व्यक्तीने चुकीचे दावा दाखल करून स्टे मिळविला होता . न्यायालयाच्या ही बाब निदर्शनास आणून दयायला पाहिजे त्यांनी पुर्ण न्याय प्रक्रियेचा अवमान केलेला आहे.असे केल्यास हे प्रकरण महापालिकेच्या बाजूने स्ट्रॉग होईल. 3-9-2007 रोजी स्टे व्हॅकेट होतो त्यानंतर 11-10-2007 पर्यत एक महिण्याच्या कालावधीत प्रशासनातील अधिकारी यांनी का कार्यवाही केलेली नाही याची चौकशी केली जाईल पॅनेलवर जे वकील आहे ते पगारवर नाही जोपर्यत त्यांनी केलेली चूक सिध्द होत नाही तोपर्यत ते मॅनेज झाले बाहेर वाटाघाटी करतात असे शब्दात बोलणे योग्य नाही ते महापालिकेचे प्रतिनिधीत्व करतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स्टे व्हॅकेट झाल्यानंतर पूढील कार्यवाही करण्याचे काम विधी विभागाचे होते. सदस्यांचा अपमान झालेला चालतो वकीलांचा होवू नये अशी भुमिका प्रशासनाची असेल तर योग्य नाही मा.आयुक्तांना दुरध्वनीवरून माहिती दिली तरी कार्यवाही होत नाही.मागिल बैठकीत 24 तासाच्या आत कार्यवाही करण्याचे उपआयुक्त महसूल यांनी आश्वासन दिले होते का केली नाही.

उपआयुक्त(म) : 24 तासात अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस आयुक्त यांना पोलीस बदोबस्त करण्याची विनंती केली होती त्यांनी असमर्थता दर्शविल्यामूळे कार्यवाही करता आली नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : जो खुलासा केला तो योग्य वाटत नाही. पोलीस संरक्षण मिळाले नाही तर कोणतेच अतिक्रमण काढणार नाही का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा.न्यायालयात तारीख मिळत राहिल सभागृहात चर्चा होत राहिल विधी सल्लागार पैसे घेत राहतील या विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर स्टे मिळाला नसता.मा.आयुक्तांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतरही कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.विरूध्द पार्टीला सहा सहा वेळेस स्टे मिळतो.

श्री.संजय जोशी : प्रशासनाने या बाबतील सखोल चौकशी करून कार्यवाही करणे गरजचे आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : माझ्या वार्डातही खुल्या जागेवर असलेले अतिक्रमण वारंवार कल्पना देवूनही काढले जात नाही कार्यवाही झाली नाही तर मी महापालिकेच्या गेट समोर उपोषणास बसेल याची नोंद घ्यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : पोलीस संरक्षण मिळत नाही म्हणून अतिक्रमण हटविले नाही हेच उत्तर दोन तीन महिण्यापासून मिळते. जर पोलीस संरक्षणाची मागणी केल्यानंतर पीआय कडून त्यास प्रतिसाद मिळत नसेल तर त्यांचेवरही नियमानूसार गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. उस्मानपूरा क्रांतीचौक ते बाबा पेट्रोल पंप पर्यत मा.जिल्हा न्यायालयाच्या समोर फुटपाथवर रस्त्याच्या बाजूला मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले त्यासाठी पोलीस संरक्षणाची गरज नाही.

श्री.अ.रशिद खान : 29 पोलीस महापालिकेकडे होते एक पोलीस निरीक्षक जीप गाडी दिलेली होती. त्यापैकी 13 पोलीस कर्मचारी आहे त्यातील ही किती हजर किती गैरहजर यांचे रेकॉर्ड नाही. ते रेकॉर्ड कुणाकडे असतात याची ही चौकशी करावी. काल महापालिकेचे इमारत निरीक्षक यांना लोकांनी पोलीसा समोर मारहान केली जात असेल तर योग्य नाही कशासाठी हा खर्च पोलीसावर करीत आहे.

प्रशासकीय अधि. : एक पोलीस निरीक्षक तसेच 13 पोलीस शिपाई, त्यात दोन महिला पोलीस शिपाई आहेत. यापैकी दोन कायम सुट्टीवर असून 1 आजारी आहे. 9 ते 10 पोलीस कर्मचारी असून त्यापैकी एक गनमॅन असून आठ कर्मचारी त्यातील एक कार्यालयात काम करतात. सात पोलीस कर्मचारी साईडवर बोलविले जाते त्यातील काही येतात काही येतच नाही. सर्व पोलीस कर्मचारी संरक्षणासाठी द्यावे. वारंवार मागणी केलेली आहे. पोलीसांना साईटवर आल्यावर पी.आय. यांनी ऑर्डर दिल्यावरच कार्यवाही करू असे उत्तर त्यांचेकडून मिळतात. साईटवर पीआय यांना बोलवूनही ते कधीही साईटवर आलेले नाही. उस्मानपूरा येथे महापालिकेच्या कर्मचा-यावर हल्ला झाला त्यावेळी पीआय तेथे बोलवून आलेले नव्हते.

श्री.अ.रशिद खान : सदर पोलीस कर्मचारी काम करीत नसेल तर तसे पोलीस आयुक्त यांना कळविले का?सदर पोलीस कर्मचारी कुणाच्या अखत्यारीत काम करतात. 29 पैकी 13 पोलीस कर्मचारी का उर्वरीत कुठे गेले त्यांचे रेकॉर्ड कोण ठेवते हजेरी कोण घेते.याची माहिती द्यावी. पोलीस कर्मचारी असूनही नाही म्हणून उत्तर दिले जाते. हे बरोबर नाही.

मा.आयुक्त : कोणते ही सण वगैरे येतात त्यावेळी आपल्याकडील पोलीसाची संख्या कमी होते.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : माझ्या वार्डात खुल्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे अनेक वेळा निदशर्नास आणून दिल्यानंतरही काढले जात नसेल तर मी महापालिकेच्या गेट समोर उपोषणास बसेल यांची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त : 10 डिसेंबर पर्यंत पोलीस बंदोबस्त मिळणार नाही. तसे लेखी पत्र आलेले आहे.

श्री.वसंत नरवडे : स.सदस्य श्री. अ.साजेद बोललेल्या जागेच्या प्रकरणा विषयी संबधीतास स्टे कशाच्या अधारे मिळाला. विड्रॉ झाल्यानंतर महापालिकेच्या वतीने वकील कोण होते. ज्या दिवशी स्टे मिळतो त्या वेळेस महापालिकेच्या वकीलाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास का आणून दिले नाही. स्टे मिळायला नको पाहिजे तो मिळाला हे मा.आयुक्तच कबूल करीत आहेत. अशा प्रकरणात महापालिकेच्या वकीलाकडून खुलासा मागविणार की नाही? अशा प्रकारे मा.न्यायालयाची फसवणूक केली जाते हे सर्वाच्या लक्षात येते. असे असेल तर या प्रकरणात नेमके काय झालेले आहे व मा.आयुक्त काय कार्यवाही करणार ते सांगावे व हा विषय मिटवावा..

मा. आयुक्त : या प्रकरणात मा.जिल्हा न्यायालयाची स्थगिती असुन ती डिले कन्डोन हेरींगपुरता आहे. 22 तारखेला सुनावणी होती. आता त्यापुढील तारीख दिलेली आहे. संबंधीताने न्यायालयीन प्रक्रीयेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला हे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. स्थगिती आदेश उठविल्यानंतर संबंधीतांवर कायदेशीर कार्यवाही करावी लागणार आहे. कारण आपल्याकडून दोन चुका झालेल्या आहे की, दि.3.9.2007 च्या नंतर जेव्हा एक महिना स्टे नव्हता त्यावेळी ठीक आहे पोलीस बंदोबस्त नाही मिळाला. परंतु जास्त फोर्स करून कार्यवाही करावयास पाहिजे ती एक चुक झाली. दुसरे असे की, जिल्हा कोर्टात जेव्हा कॅव्हेट दाखल असतांना फक्त डिले कंडोनेशनच्या हेरींगपुरता स्टेटस्को मिळालेला आहे. त्यावेळी जास्त फोर्स करावयास पाहिजे होता. ते मिळून द्यायला नको होता. जे काही जिल्हा

न्यायालयात दावा दाखल केला मेरीटवर नंतर होईल. त्या वेळेत सात दिवसाच्या आत त्यांनी केले नाही. त्यामध्ये ते प्रकरण खारीज व्हायला पाहिजे. त्या कारणामुळे त्यांना स्टे मिळतो त्यामुळे महापालिका कुठेतरी कमी पडत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी कुठल्याही परिस्थितीत स्टे उठला पाहिजे. लवकर होत नसेल तर स्पेशल पिटीशन दाखल करावे लागेल. समोरची पार्टी यांनी एवढी मोठी चूक केलेली आहे की, न्यायालयीन प्रक्रीयेचा त्यांनी अवमान केलेला आहे. संबंधीतावर खालच्या न्यायालयात कन्टेम्ट ऑप कोर्ट दाखल व्हायला पाहिजे. त्यांनी विड्रॉ केले ते कन्टेम्ट केल्यानंतर विड्रॉ केलेले आहे. संबंधीताविरूध्द गुन्हा पण दाखल करायला पाहिजे. जोपर्यंत अशी कार्यवाही करणार नाही तोपर्यंत महापालिका कुठेतरी कमी पडत आहे हे सिध्द होणार. मा.न्यायालयाच्या हे सर्व निदर्शनास आणून देऊन स्टे उठवायला पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 2 महिने 9 दिवसात कार्यवाही केली नाही. विधी सल्लागार यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.संजय शिरसाट : मागिल अधिवेशनात आमदारांनी गुणवानी प्रकरणात प्रश्न उपस्थित केलेले आहे. गुणवाणी प्रकरण हास्यास्पद झालेले आहे. गुणवानीवर रिकव्हरी सुट दाखल करण्यासाठी संचिका 15 ते 20 दिवस एक दुस-या टेबलावर जात होती. त्यांचेवर रिकव्हरी सुट दाखल झालेला आहे काय? दुसरे प्लॉटधारक यांना महापालिकने 22 ते23 लक्ष रू. दिले त्यांनी महापालिकेला 127 ची नोटीस दिलेली होती.त्या नोटीसच्या अधारे मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून ती जागा भुसंपादीत केली होती.त्यात राजकीय हस्तक्षेप झाल्यामूळे काहीच कार्यवाही न झाल्याने ती रक्कम मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ती रक्कम वसूल करायची आहे. त्या प्रकरणात काय कार्यवाही झाली तसेच काही अधिका-यांना कारणे दाखवा नोटीसेस दिलेल्या होत्या त्याचे उत्तर आले ते समाधानकारक नाही असे मा.आयुक्ताचे म्हणणे आहे वृत्तपत्रात आले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : गुलशन क्लॉथ दुकानच्या संदर्भात पीटीशन विड्रॉल केले आता आपण तोंडून दाखवा असे बोलण्या मागे विधी सल्लागार यांचा हेतू काय होता तसेच 24 तासाच्या आत सदर दुकान काढण्याची कार्यवाही करणार होते का केली नाही.

विधी सल्लागार : पीटीशन ख्ररोखरच विड्रॉल झालेले होते. आता तोडण्यास हरकत नाही मा. उपआयुक्त तसेच संबधीत विभगाचे अधिकारी यांना सांगितले तर सदर बांधकाम काढता येईल असे मी म्हटले होते.

मा.आयुक्त : जिल्हा न्यायालयाचे जे स्थगिती आहे ती आदेश उठवून घेण्याची गरज आहे. पुढील तारखेच्या वेळी आवश्यक असेल तर आणखी सिनीयर वकील घ्यावेत.

विधी सल्लागार : महापालिकेच्या वतीने वकील पत्र दाखल केलेले होते या प्रकरणात एकाच वेळेला वकील पत्र दाखल झाले. एकाच वेळेस वकील पत्र दाखल करून सुनावणी करता येत नाही म्हणून पूढील 11 तारीख मिळाली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 8 पिटीशन मध्ये मा. उच्च न्यायालय मा. सर्वोच्च न्यायालय मध्ये डिसाईड केले जाते. एकाच प्रकरणात तारीख वाढवून दिली जात नाही ती घेतली जाते.आरोग्य विभगातील दोन कर्मचारी यांना 4500 रू. रक्कमेच्या घोटाळयात निलंबीत करण्यात आले. 4.30 वा. निलंबीत लगेच त्यांचेवर पोलीसात 5.30 वा. गुन्हा दाखल कार्यवाही करण्यात येते. गुणवाणी प्रकरणात 1.12 कोटीचा गैर व्यवहार झाला त्या अधिकारी कर्मचा-यांवर कार्यवाही केली जात नाही असा भेदभाव कशासाठी प्रशासन करते.

मा.सभापती : या प्रकरणात मा.न्यायालयाने 11 तारीख दिलेली आहे.महापालिकेच्या बाजूने निकाल लागल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.संजय शिरसाट : गुणवाणी प्रकरणात काय कार्यवाही केलेली आहे माहिती द्यावी.

मा.आयुक्त : गुंणवाणीच्या प्रकरणातील जागा ही भुसंपादन कार्यालयामार्फत मिळालेली आहे.त्या जागेवर महापालिकेचे नाव पण आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांचेशी बोलणे पण झालेले आहे. एलोरा फॅस्टीवल संपल्यानंतर महापालिका प्रशासन व जिल्हाधिकारी एकत्रीत बसून जे जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी ज्यांचेकडून चुक झाली त्यांचेवर पूढील कार्यवाही करण्याची ॲक्शन घेतली जाईल. रिकव्हरी सुट पूर्णपणे तयार झालेला आहे. उद्या

कोणत्याही परीस्थितीत ते दाखल होईल. अधिका-यासंबधी कार्यवाही सुरू केलेली आहे श्री.राठोड यांचे उत्तर आलेले नाही. संचालक नगर रचना औरंगाबाद यांचे अधिपत्त्याखली ते काम करतात त्यांना एक डिओ पत्र देवून त्यांचेवर विरूध्द कार्यवाही करण्याचे सुचविले जाईल.महापालिकेचे नाव लावण्या बाबत काय कार्यवाही केली विधी सल्लागार यांनी खुलासा द्यावा.

विधी सल्लागार : या संदर्भात दोन ॲडव्होकेट यांचेशी चर्चा केली असता एकाच वेळी रिकर्वी सुट दाखल करणे व नाव लावणेची कार्यवाही करता येईल. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

श्री.संजय शिरसाट : श्री.जयराम साळुंके यांनी 127 ची नोटीस महापालिकेला दिली.मा. जिल्हाधिकारी यांचेकडे हे प्रकरण गेले. त्यावेळी दोन प्रकरण होते. जयराम साळुकें यांचे 22 लक्षचे प्रकरण होते ते मा. जिल्हाधिकारी यांचेकडे गेलेले बरे असे प्रशासनास वाटले. गुणवानीला 80 लक्ष दयायचे ते महापालिकेने दिलेले बरे म्हणून खाजगी वाटीघाटी केली. जयराम राळुके यांनी 127 ची नोटीस दिल्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मॅटर गेले जो मुळ मालक होते त्यांनी लोकशाही दिनामध्ये अपील केलेले होते.चुकीच्या पध्दतीने मोबदला घेत आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी लोकशाही दिनाच्या वेळी 2003 ला त्या संदर्भात निर्णय दिला की श्री.कपाळे नावाचे भुसंपादन अधिकारी होते त्यांनी चुकीच्या पध्दतीने जो मालक नसतांना त्यांना मोबदला दिला तो वसूल केला पाहिजे असे पत्र दिलेले होते. लोकशाही दिनामध्ये महापालिकेचे अधिकारी उपस्थित असतात.असे असतांना 2003 पासून आजपर्यत त्या प्रकरणात काय कार्यवाही केलेली आहे खुलासा करावा.

मा.आयुक्त : सदर व्यक्तीला पेमेन्ट जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून झालेले आहे त्यामूळे वसूली करण्याचा प्रश्न महापालिकेचा येत नाही. जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करून या आठवडयामध्ये कार्यवाही सुरू होईल.

श्री.संजय शिरसाट : लोकशाही दिनाच्या वेळी अपील कर्ता यांनी अर्ज दिला व चुकीच्या व्यक्तीला मोबदला दिला गेला म्हणून तक्रार केली त्यावेळी मा. जिल्हाधिकारी यांनी ही रक्कम संबधीताकडून वसूल करावी म्हणून महापालिकेला पत्र दिले. त्या विभागाची जबाबदारी होती तर 2003 पासून तसे पत्र देवून महापालिकेने कळविले असेलच त्याची प्रत दाखवावी.

मा.आयुक्त : या प्रकरणात 2003 नंतर काय कार्यवाही केली याबध्दल सध्या माझेकडे माहिती नाही. परंतू या जागेचे पेमेंन्ट व महापालिकेचे नाव लावण्याची कार्यवाही भुसंपादन विभागाच्या मार्फत झालेली असल्यामूळे महापालिकेला काही अडचण नाही. वसुलीचा मुद्या समोर आला तर जिल्हाधिकारी कार्यालयाने वसूली करावे व जो मुळ मालक आहे त्यांना द्यावी कारण ती जागा जी आहे ती महापालिकेची राहिल कारण ती भुसपांदन विभगाकडून महापालिकेने घेतलेली आहे. या केसेसमध्ये तीन वेळेस नोटीस जाते, ओनर व व्हॅल्युएशनच बात सुनावणी होवून नंतर पेमेंन्ट केले जाते. भुसंपादन विभगाच्या मार्फत एकदा जागा ताब्यात आली ती कोणत्याही परीस्थितीत परत जावू शकत नाही. गुणवानी यांना खजगी वाटाघाटीने दिले आहे ते लिगली सेप्टी नाही.भुसंपादन विभागामार्फत दिले असते तर महापालिकेचे नाव कमी होण्याचा प्रश्नच नसता. गुणवाणी प्रकरण हे महापालिकेच्या लेवलचे आहे.

श्री.संजय शिरसाट : जो कुणी त्यावेळचे भुसंपादन अधिकारी व जयराम साळुके यांनी संगनमताने हे काम केले 22 लक्ष बुडाले ते येतील हे कितपत योग्य वाटते.

मा. आयुक्त : महापालिकेचे 22 लक्ष रू बुडाले असे म्हणणे योग्य नाही जागा महापालिकेच्या नावावर आहे जर अ व्यक्ती आला व त्यांनी चुकीचे दाख्वून रक्कम घेतली असेल तर अ व्यक्तीकडून रक्कम वसूल करून जे मुळ मालक आहे त्यांना द्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे.

श्री.संजय शिरसाट : गुणवाणी प्रकरणात जे भुसंपादन अधिकारी होते त्यांनी जे चुकीच्या व्यक्तीला पैसे देण्याची आदेश काढले ते वसूल करावे असे जेंव्हा मा. जिल्हाधिकारी सांगतात. याचा अर्थ जी जागा भुसंपादीत केली ती चुकीची खरेदी केली असाही होत असेल गुणवाणी प्रकरण या सभागृहात गेल्या 4 महिण्यापासून तसेच वृत्तपत्रात छापून येते.त्या व्यक्तीला 80 लक्ष

दिले.त्यानंतर त्या व्यक्तीवर कार्यवाही झाली त्यांना बेल मिळाली.80 लक्ष साठी संबधीत गुणवानी यांचे कुटूंबातील 10 लोकांवर गुन्हा नोंद करण्याचे आदेशीत केले परंतु रिकव्हरी सुट दाखल करण्यासाठी प्रशासनाने केलेल्या खुलाशातून जे उत्तर निघते त्यानूसार आणखी दीड दोन महिण्याचा विलंब होण्याची शक्यता आहे. रिकव्हरी सुट दाखल करण्यासाठी वेळ होत असेल तर गुणवाणी यांचे असलेल्या मालमत्ताची रजिस्ट्री वगैरे होवू नये तसे पत्र संबधीत विभगाकडे द्यायला पाहिजे होते जेणे करून त्या माध्यमातून 80 लक्ष वसूल करता येतील.

मा.आयुक्त : रिकव्हरी सूट उद्या दाखल होईल त्यावेळी श्री. गुणवाणी यांचे कोणत्या मालमत्ताचा व्यवहार होवू नये म्हणून तसा मद्दा मांडता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : श्री.घोरपडे यांची 1983 ला रस्त्यामध्ये जागा गेली त्याजागेचा 1984 ला 1.82 लक्ष मोबदला घेतला जागेचा मोबदला पुन्हा जागेच्या बदल्यात जागा दिली जाते.जी जागा दिली त्यांनी त्यावर बांधकाम परवानगी घेतली बांधकाम सुरू केले प्रकरण न्यायप्रविष्ठ या समितीमध्ये चर्चा होते त्यामूळे चौकशी अहवाल मागविला असता त्यात माधवराव घोरपडे तर नगरपरीषदेच्या काळाात मनोहर घोरपडे अशी नावे दाखवले खोटी कागदपत्र सादर करून थगिती आदेश मिळविले या प्रकरणात महापालिकेचे वतीने कोणते वकील हेरींगला हजर होते. चुकीची कागदपत्रे महापालिकेत तयार होत असेल लोकाच्या घशात जागा जात असेल किती दिवस सहन करणार आहे.त्या जागेची मोजणी करण्याची मागणी त्यानी केलेली असून त्या प्लॉटला 30,40,80 फुटाचे असे तीन बाजूने रस्ते असून एक नाला वाहतो असे दाखवले आहे परंतू मी ज्या प्लॉटविषयी बोलतो त्या प्लॉटला कोणताही नाला नाही. तीन रस्ते नसून एक 80 फुटाचा रस्ता आहे. याचा अर्थ एकीकडे दुसरी जागा दाखवित असून एका जागेवर अतिक्रमण करीत आहे. त्यांना जागा देवून त्याचे नावाचे पीआर कार्ड तयार करण्यात आले यात अधिका-यांची चूक आहे त्याचेवर कार्यवाही करणार की नाही सर्व प्रथम दिलेली बांधकाम परवानगी रद्य करण्याची तसेच केलेले बांधकाम पाडण्याची मा. न्यायालयाकडून परवानगी घ्यावी.

मा.आयुक्त : या प्रकरणात या सभागृहात चर्चा झाल्यानंतर शहर अभियंता श्री. सोनी यांना चौकशी साठी नियुक्त केले होते सर्व पॉईन्ठ सिध्द होतात तसा रिपोर्ट त्यांनी सादर केला त्याबाबती अधिका-यांची चौकशी करण्याचे आदेशीत केलेले असून सहा.संचालक नगररचना यांना श्री. घोरपडे यांनी घेतलेली बांधकाम परवानगी रद्य करण्याची व सदर लेआउटची पुन्हा मोजणी करण्याचे तसेच पीआर कार्डवर नाव आलेले आहे ते कमी करण्याचे कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे. स्थायी समितीने जो ठराव घेतला होता. तो रद्द करण्यासाठी पाठवावा लागेल तसेच आयुक्तांचे आदेश असतांना देखील ठरावाची अमलबजावणी केली त्यांचेवर खातेनिहाय चौकशी करून त्याचा खुलासा मागविलेला आहे.एक दोन दिवसात खातेनिहाय चौक्शीचे आदेश काढले जातील.पीआर कार्ड ची नोंद रद्य करण्यासाठी अपील केले जाईल. पूर्वी त्यांनी जागेचा मोबदला घेतलेला आहे पुन्हा जागा देण्यात आली हे मा. न्यायालयाच्या निदर्शास आणून दयावे लागेल.आयुक्तांनी ठेवलेला प्रस्ताव वेगळा होता स्थायी समितीने वेगळा निर्णय घेतला तो ठराव रद्य करण्याचे आदेश आयुक्तांनी दिल्यानंतरही तसे न होता त्यांची अमलबजावणी करण्यात आली.

श्री.हिम्मतराव दाभाडे : चौकशी वगैरे होण्यास उशीर लागेल श्री घोरपडे यांनी महापालिकेच्या जागेवर अनधिकृत दुकाने काढून व्यवसाय सुरू केला त्याला उत्पन्न मिळते लगेच काय कार्यवाही करणार आहे.

मा.आयुक्त : ती इमारत डि.सी. रूलप्रमाणे लिगल आहे ती इलिगल मालकाने घेतलेली आहे ती इमारत महापालिकेच्या ताब्यात घेवून विल्लेवाट लावली जाईल असे मत मा.न्यायालयात मांडता आले तर विधी सल्लागार यांनी प्रयत्न करावे.

विधी सल्लागार : परवानगी घेवून इमारत बांधलेली आहे आताच म्हटल्याप्रमाणे तसे करता आले तर विचारविनिमय करून कार्यवाही करता येईल.

श्री.संजय शिरसाट : यापूर्वी श्री. सोनी साहेब यांनी चौकशी अहवाल दिला, त्यात सात हजार चौ.मी. जागा निघते त्यातील तीन हजार चौ.मी. त्यांनी मागविलेली आहे.दोन्ही अहवाल एकाच अधिकारी यांनी वेगवेगळे कसे देवू शकतात.

मा.आयुक्त : चौकशीच्या वेळी कदाचित त्यांनामाहिती नसेल की संबधीतानी जागेचा मोबदला घेतलेला आहे.

श्री.संजय शिरसाट : एका व्यक्तीने दुस-या जागेचा उच्च न्यायालयाकडून स्थगिती आणली.आणि माधवराव घोरपडे यांना आपल्या जागेवर स्टे आणला म्हणून कळविले. परंतू ती जागा त्यांची नव्हती. यानंतर श्री.सोनी साहेब यांनी त्यांना आपली परवानगी बरोबर आहे म्हणून पत्रव्यवहार केला मला कुणाचा त्रास व्हायला नको म्हणून सदर व्यक्ती मा.न्यायालयात गेले व महापालिका तसेच सर्व सदस्यांच्यावर स्टगिती आदेश आणले.व जे कुणाचे जे काही म्हणणे असेल ते मा. न्यायालयात मांडावे त्यानूसार संबधीतावर कार्यवाही करणे योग्य राहिल.

श्री.वसंत नरवडे : ई-टेडरींग दोन तास बंद होती टेंडर भरण्याचे का लोड झालेले नाही मी लेखी पत्र दिलेले त्याचे उत्तर मला मिळाले नाही.

मा.आयुक्त : उद्या आपल्या पत्राचे उत्तर दिले जाईल. परंतू संगणक कुणी बंद करू शकत नाही. ही सत्य परीस्थिती आहे.

डॉ.आशा बिनवडे : सेव्हनहिल उडडाणपूलाच्या बाजूला आरआरसीचे कॉलम जाहीरात फलक लावण्यासाठी उभारले आहेत. त्यात हॉटेल चालू आहे. जाहिरात फलक लावण्यासाठी काम चालू आहे त्यास परवानगी दिलेली आहे.

मा.आयुक्त : प्रशासकीय अधिकारी यांनी तेथे जावून चौकशी करावी परवानगी नसेल तर बोर्ड काढण्यात यावे संबधीतावर पोलीसात गुन्हा दाखल करावा.

डॉ.आशा बिनवडे : माझ्या वार्डातील आरक्षणावर अनधिकृतपणे बांध्काम होते या संदर्भात मागिल बैठकीत चर्चा केली कार्यवाही केली नाही.

मा.सभापती : मा.प्रशासनाने या संदर्भात पुढील बेठकीत सविस्तर माहिती ठेवावी.

श्री.वसंत नरवडे : नवीन मालमत्ता सर्वेक्षणाचे स्पेक एजन्सीला काम दिले किती नवीन मालमत्ता शोधल्या स्पेकने सर्वे करण्या अगोदर सन 2005-06 मध्ये किती मालमत्ता होत्या सन 2006-07 मध्ये पूर्वी पेक्षा किती जास्तीची वसूली झालेली असून सन 2007-08 साठी किती डिमांड पाठविलेल्या आहे. माझे माहिती प्रमाणे गेल्या दोन वर्षापेक्षा डिमांड यावर्षी कमी आहे.

मा.सभापती : स.सदस्य यांनी या संदर्भात लेखी स्वरूपात माहिती द्यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मा. जिल्हा न्यायालय समोरील रस्त्याच्या बाजूला फुटपाथवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे केंव्हा हटविणार आहे.

मा. आयुक्त : हटविल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होते ही वस्तुस्थिती आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : पुन्हा होत असेल तर त्यांचे दंडात्मक कार्यवाही करावी. जेणे करून अतिक्रमण होणार नाही.

मा.आयुक्त : दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी दंडाची रक्कम वाढविण्याचा प्रस्ताव ठेवला जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : भुसंपादनाचे किती रक्कम भूसंपादन अधिकाऱ्याकडे डिपॉजीट आहे. रोषणगेट ते किराडपूरा या रस्त्याचे दोन वर्षापूर्वी दीड कोटी जमा केले जमा होवूनही काही उपयोग होत नाही दोन वर्षापासून एकही मालमत्ता घेतलेली नाही.वार्ड क्र. 97 मध्ये एका जमिनीचा मोबदला रू.54,80,522/- जमिन एका व्यक्तीची मोबदला दुसऱ्याच व्यक्तीला दिला. जागेचा ताबा घेण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी गेले असता. मुळ मालक यांनी भंडण केले. या संबधी जे कुणी अधिकारी जबाबदार आहे त्यांचेवर कार्यवाही होणे अपेक्षीत होते.झाली नाही. 1975 डीपी प्लॅननुसार दुस-या एका प्रकरणात सिटीचौक येथे मा.उच्च न्यायालयाची भाडेकरूने स्थगिती आणलेली असतांना जागेचा मोबदला म्हणून 56 लक्ष दिले गेले. जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात नाही. संबधीत व्यक्तीने न्यायालयाकडून स्थगिती आणली. दोन वर्षात महापालिकेचे अशा प्रकरणात 8.32 कोटी रू. भूसंपादन अधिकारी यांचेकडे दिले असून अद्याप महापालिकेच्या ताब्यात जागा नाही यास कोण जबाबदार आहे.

श्री.संजय जोशी : जागा ताब्यात आल्यानंतर मोबदला दिला पाहिजे.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | : 2/3 रक्कम सुरूवातीला भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठवतात. 1/3 ॲवॉर्डच्या वेळी व ताबा घेतात व नंतर पैसे देतात. |
| श्री.संजय जोशी | : आपले अधिकारी गेले होते. त्यांना बंधाऱ्याखाली उतरावे लागले. पैसे देवून चुटकीने खाली पाठवतात. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : श्री.खरवडकर हे टी.पी. चे अधिकारी गेले होते. |
| मा. आयुक्त | : महापालिकेचे नाव लावणे पीआर कार्ड तयार होण्याच्या दृष्टीने सेवानिवृत्त अधिका-याची समिती आपल्या मान्यतेने नियुक्त केलेली आहे.169 मालमत्ताची यादी तयार झाली असून 54 लक्ष 56 लक्ष रक्कम दिलेल्या जागा सुध्दा महापालिकेच्या पजेशन मध्ये घेण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. श्री.खरवडकर गेले असतील, मला माहित नाही. |
| मा.सभापती | : महापालिकेच्या मालमत्ता लवकरात लवकर ताब्यात कशा येतील यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : विष्णुनगर भागातील नाल्याच्या बाजूला 14 नागरीकांची घरे होती त्यांना मोबदला दिला नाही. |
| मा.आयुक्त | : मोबदला दिला जाणार नाही, सर्वसाधारण सभेने ठराव घेतला आहे. पर्यायी जागा डिसेंबरच्या अगोदर देण्याची कार्यवाही होईल. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : उस्मानपूरा रस्त्याच्या लगत श्री. प्रकाश निकाळजे यांनी दोन ठिकाणी अतिक्रमण केलेले असून या संदर्भात अनेक वेळा मी निदर्शनास आणून दिले अदयाप काढले नाही. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी यांनी या संबधी लक्ष देवून कार्यवाही करावी. |
| श्री.संजय शिरसाट | : सातारा परीसरात कर्मचा-यांना घराचे वाटप करण्यात आले परंतु ती घरे निष्कृष्ट दर्जाची आहेत, घरांना भेगा पडल्या. मा.आयुक्तांनी सदर ठिकाणी भेट दिली असे वृत्तपत्रात छापून आले. ज्यांना घरे दिली त्यांचा मुळ पगार कमी होता एवढया महागडया घराच्या स्कीममध्ये ते बसत नव्हते तरी त्याचं पेमेन्ट स्लीप वाढवून त्यांना त्यात घेण्यात आले. या नेमके प्रकरण काय घडले खुलासा द्यावा. |
| मा.आयुक्त | : यात महापालिका प्रशासनाचा संबध येत नाही. अधिकारी कर्मचारी यांना स्वतःचे घर असावे म्हणून कमी किमतीत घर देण्याची स्कीम होती. प्रशासन व कर्मचारी एकाच कुटूंबातील मेंबर समजून ही योजना अमलात आणलेली होती. या स्कीम मूळे कर्मचा-यांना कमी किंमतीत घर मिळू शकले. तसे बिल्डरशी चर्चा करूनच हे सर्व काही केलेले होते. ज्यांचे नाव अगोदर येते त्यांची नावे यादीत येतात. 200 ते 250 घराची स्कीम होती त्यातील 60 लोकांनी घेतलेले आहे ही घरे बोगस व कर्मचा-याची फसवणूक होत आहे असे जेंव्हा कळाले तेंव्हा आपले कर्मचारी म्हणून काही टेक्नीकल अधिकारी तेथे पाहणी करण्यासाठी पाठविले होते. काही लोकांना कमी जागेत काहींना त्यापेक्षा जास्त जागेत घरे वाटप केली गेली. त्या एक एक घराची त्या कर्मचा-यांनी बुकीग केलेली आहे.ती दिलेली घरे योग्य की अयोग्य आहे यांचे मेजरमेंन्ट करण्यासाठी कार्य. अभियंता श्री. पानझडे यांना पाठविण्यात आले व स्पेसीफिकेशनप्रमाणे ती दुरूस्त करून देण्याची संबधीत बिल्डरशी चर्चा केलेली आहे |
| श्री.संजय शिरसाट | : त्या कर्मचा-यांच्या नेट पेमेन्ट स्पील बघता ते हप्ता भरू शकत नव्हते. त्यांची पेमेन्ट स्पील वाढवून दिली. त्यामूळे त्यांना यात समावून घेतले. प्रशासनाचे अधिकारी काही संबध नसतांना टेक्नीकल बाबी तपासणी साठी सदर जागेवर पाठविले. कर्मचारी यांची समोरच्या व्यक्तीने 60 लक्ष रू.ची फसवणूक केलेली आहे प्रशासनाला कर्मचा-यासाठी एक सामुहिक मदत म्हणून त्या बिल्डरवर पोलीसात फसवणुकीचा गुन्हा दाखल करता येउ शकतो. |
| मा.आयुक्त | : फसवणूक झाली असेल तर आपले अधिकारी तेथे जावून कामाची क्वॉलीटी चेक करून अहवाल देतील. आपले कर्मचारी म्हणून महापालिका प्रशासन मदत करीत आहे. |
| श्री.संजय जोशी | : एक बिल्डर येतात अधिका-यांना भेटतात महापालिकेच्या वतीने कर्मचा-यांना प्रपोज केले जाते. त्याचे वेळी कर्मचा-यांच्या निदर्शणास आणून दयायला पाहिजे होते. |
| श्री.मधुकर सावंत | : यात महापालिकेचे किती रक्कम खर्च झालेली आहे. |

मा. आयुक्त : महापालिकेचा काहीही संबध यात येत नाही प्रत्यक्ष जागेवर जावून कामाची क्वॉलीटी सरासरी चांगली असेल तरच घ्यायला पाहिजे होते. कर्मचा-यांनी परस्पर बिल्डरशी संपर्क करून घेतलेले आहे महापालिकेचा काहीही संबध यात येत नसून आपले कर्मचारी म्हणून प्रशासन मदत करीत आहे.

मा.सभापती : यात कर्मचा-यांची फसवणूक होवू नये यासाठी प्रशासनाने मदत करून त्यांना न्याय मिळवून द्यावा.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**

महानगरपालिका औरंगाबाद